UNIVERSAL LIBRARY
OU_192487
UNIVERSAL LIBRARY

वेलणकर प्रकाशन : १ :

# सिंधुलहरी

लघुनिबंध

व

कथा–संग्रह

: लेखक :

पांडुरंग अनंत वेलणकर

प्रथमावृत्ति

१९४९

किंमत १॥। रु.

: प्र का श क :

पां. अ. वेलणकर

1951 वेलणकर प्रकाशन

२७ युसुफ बिल्डिंग, व्हिन्सेंट रोड,

दादर, मुंबई १४

; चित्रकार ;

श्री. रघुवीर मुळगांवकर

: मुद्रक :

कृष्णाजी नारायण सापळे,

रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,

त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४


शालोपयोगी पुस्तकें, उत्कृष्ट बालवाङ्मय, नाटकें, कादंबऱ्या, धार्मिक ग्रंथ, डायऱ्या, पंचांग, मिळण्याचें दादरमधील

**आदर्श बुक डेपो**

लेडी जमशेटजी रोड, दादर, मुंबई नं. १४

हेंच खात्रीलायक ठिकाण होय



CHECKED 1956

**ताज्या फुलांचा सुगंध पसरविणारी अगरबत्ती!**




शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं

**उंदीर छाप सौंदर्यप्रसाधनें**

जस्मीन ऑईल ★ ब्रिलियण्टाइन

कॅस्टर हेअर ऑईल ★ कोकोनट

चमेली, लव्हेण्डर ऑईल, अत्तरें

**बॉम्बे अगरबत्ती कंपनी**

सीम्प्लेक्स बिल्डिंग, पाववाला स्ट्रीट

कृष्ण सिनेमाजवळ, मुंबई नं. ४

★ प्रिय पत्नी –

सौ. सुलोचना हीस

सप्रेम अर्पण ★

# वाचण्यापूर्वीं:—

सिंधुलरी—लघुनिबंध व कथा यांचा संग्रह रसिक वाचकांना सादर करतांना मला अत्यानंद होत आहे. यांतील लघुनिबंध व कथा १९३९ ते १९४४ च्या दरम्यान लिहिलेल्या असून त्यांतील कांही सत्यकथा, भगिनी, भालचंद्र, प्रकाश, युवक (हस्तलिखित) वगैरे मासिकांतून व साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांना प्रसिद्धी दिल्याबद्दल संपादक महाशयांचा मी आभारी आहे. तसेंच माझ्या लेखनकार्यांत मला मोठ्या आस्थेनें मार्गदर्शन करणाऱ्या माझ्या स्नेह्यांचाही मी अत्यंत ऋणी आहें. पुस्तकाची सुंदर व आकर्षक छपाई करून दिल्याबद्दल रामकृष्ण प्रेसचे चालक व त्यांचा सहकारीवर्ग यांचेही आभार मानावे तेवढे थोडेच.

२७, युसुफ बिल्डिंग,
व्हिन्सेंट रोड, दादर, मुंबई १४
**वसंत पंचमी**, ता. ३।२।४९


**उत्कृष्ट फोटो म्हणजेच जिवंत स्मृति**
आणि कॅमेऱ्यानेंच त्या जागृत ठेवतां येतात
**दत्त आणि कंपनी**
फोटोग्राफीच्या सामानाचे दादरमधील प्रख्यात
**व्यापारी**

लिहा भेटा अगर ६०८४६ टे. नं. फोन करा.

:पत्ता:
गंगा निवास
रानडे रोड,
दादर,
मुंबई

**मूल्यवान् रत्नें, हिरे, मोत्यांचे आकर्षक दागिने**
**पटवर्धन बंधू**
यांच्या पेढीवरच खात्रीलायक मिळतील.
एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा.

**साहित्यसम्राट् कै. न. चिं. केळकर यांचा**
**पां. अ. वेलणकरांच्या नाटिकावरील अभिप्राय**

श्री. पुणे
२१।३।३५

कु. सा. वि.

तुम्ही दिलेली पुस्तकें काही गाडीत काही घरी वाचली. त्यांतील अध्यापिका स्वाधिनता व मायेच्या मुली या त्यांतल्या यात अधिक आवडल्या. मानसशास्त्राचे शिक्षण देण्याला ही नाट्यमाला उपयोगी पडेल. तसेच शाळेंत हौशी नाट्य प्रयोग करण्याला. कोंकणी भाषा मला समजते म्हणून आवडली. पण देशावरील मुलांना आता ती भाषा समजत नाही हे घरच्या मुलांच्याही तीं पुस्तकें दिल्यावर कळून आले. तुम्ही एखादा चटकदार विषय घेऊन प्रौढ रंगभूमी करितां एखादें नाटक लिहावें कां पाहतां नाहीं कारण

तुम्हाला सहज चांगलें लिहितां येतील.

न. चिं. केळकर

सर्व प्रकारचें बाइंडिंग व
रूलींगचें सुबक व मनपसंत
काम फक्त

**पी. गजानन आणि कंपनी**

२३ बनामा हॉल लेन,
गिरगांव, मुंबई नं. ४

मध्येंच करून दिलें जातें
एकवेळ अनुभव घेऊन
खात्री करा.

आपल्या घराचें सौंदर्य वाढ-
विण्याकरितां

**श्री. गजानन आणि कंपनी**

जेनुइन फर्निचर मेकर्स ॲण्ड
कमिशन एजन्टस्

यांच्याकडून शोभिवंत व मजबूत फर्निचर मनपसंत तयार करून घ्या. शाळांकरितां लागणारें फर्निचर बनविणें ही आमची स्पेशॅलिटी आहे.

ठिकाणाः—कोळ्याची वाडी,
फणसवाडी, ठाकुरद्वार, मुंबई २

शालोपयोगी पुस्तकें, नाटकें, कादंबऱ्या, मासिकें, वर्तमान-पत्रें, डायऱ्या, पंचांगें मिळण्याचें
परळमधील एकच ठिकाण

**परेल बुक डेपो,**

के. इ. रोड, परेल
पोयबावडी, मुंबई नं. १२

मालक—ए. बी. रमजी

व्यापाऱ्यांस व शिक्षकांस
योग्य कमिशन दिलें जातें

तो फारच रुबाबदार दिसतो
कारण त्याचे कपडे

**एन्. जी. राव ॲण्ड सन्स**

हायक्लास टेलर्स ॲण्ड आऊट फिटर्स
दत्त बिल्डिंग, परळ, मुंबई १२

यांच्या टेलरिंग फर्ममध्येंच
शिवलेले असतात. आपणही
एकवेळ अनुभव घेऊन
खात्री करा.

# सिंधुलहरी

## अनुक्रमणिका

### —लघुनिबंध—


| | | | |
|---|---|---|---|
| १ त्यांत काय आहे ? | ... | ... | पृष्ठ ९ |
| २ सागर आणि अंतःकरण | ... | ... | ,, ११ |
| ३ आशा | ... | ... | ,, १४ |
| ४ परिस्थिति | ... | ... | ,, १८ |
| ५ अस्थिर वृत्ति | ... | ... | ,, २१ |
| ६ कुरकूर | ... | ... | ,, २५ |
| ७ जगाची रीत | ... | ... | ,, २७ |
| ८ कार्यसाधूपणा | ... | ... | ,, २९ |
| ९ मानवता | ... | ... | ,, ३२ |
| १० बन्धन | ... | ... | ,, ३४ |
| ११ बंदिवान | ... | ... | ,, ३७ |
| १२ मळकें धोतर | ... | ... | ,, ४० |
| १३ कुरुपता | ... | ... | ,, ४३ |
| १४ मुलगा आणि पराणी | ... | ... | ,, ४६ |
| १५ आधीं गोड—मग कडू | ... | ... | ,, ४९ |
| १६ एकी | ... | ... | ,, ५२ |
| १७ उजवी शेगडी | ... | ... | ,, ५६ |


### —कथा—


| | | | |
|---|---|---|---|
| १ साम्यवाद | ... | ... | ,, ६१ |
| २ योगायोग | ... | ... | ,, ६६ |
| ३ जखम | ... | ... | ,, ७२ |
| ४ प्रेमवीर | ... | ... | ,, ७६ |
| ५ तारका | ... | ... | ,, ८२ |
| ६ दोन दरवें | ... | ... | ,, ८६ |

आपल्याला **खात्रीचे दागिने** हवे आहेत ना ?—मग आपल्या **पैशाचा** आपल्याला

**योग्य मोबदला** देऊन लोकसेवा करणारे



**S. K. PALSHETKAR AND SONS**

DADAR, BOMBAY 14.

**शंकर काशिनाथ पालशेतकर ॲण्ड सन्स**

**सोन्या-चांदीच्या दागिन्याचे व जवाहिऱ्याचे व्यापारी**

कोहिनूर बिल्डिंग, लेडी जमशेटजी रोड, दादर-मुंबई १४

यांच्याकडेच आपल्याला **सोन्या-चांदीचे, हिऱ्यामोत्यांचे** फॅन्सी दागिने योग्य भावांत व खात्रीलायक मिळूं शकतील. तसेंच आपल्या ऑर्डरप्रमाणेंही योग्य मजुरींत आपल्या **मनपसंत दागिनें** तयार करून मिळतील.

**एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा**

## त्यांत काय आहे ? : १ :

एकदां मी आणि माझा एक मित्र एका संस्थेच्या सम्मेलनप्रसंगीं होणारे 'विविध कार्यक्रम' पाहावयास गेलों होतों. कार्यक्रम खरोखरच मनोरंजक झाले. त्यांतल्यात्यांत 'मास्टर दत्ताराम' यांचा तिरंदाजीचा कार्यक्रम फारच प्रेक्षणीय झाला.

त्यांच्या कार्यक्रमाच्या वेळीं प्रेक्षकांनीं टाळ्यांच्या प्रचंड वर्षावानीं तो हॉल अगदीं दुमदुमून टाकला. सर्वांच्या तोंडून त्यांची स्तुति होऊं लागली. मलाही मोह आवरला नाहीं. मी आपल्या मित्राजवळ कार्यक्रमाची प्रशंसा करूं लागलों. पण तो कसला खट ! त्यानें मला मोठ्या आढ्यतेनें सुनावलें कीं, 'त्यांत काय आहे ! मीसुद्धां हें सहज करून दाखवीन.'

मला संताप आला त्याचे हे अनुदारपणाचे उद्गार ऐकून. मीही हट्टास पेटलों होतों. कधीं पैचीही पैज न लावणारा मी, त्या दिवशीं त्याच्याबरोबर पांच रुपयाची पैज लावली.

प्रयोग संपल्यावर 'मास्टर दत्ताराम' यांच्याशीं माझी मैत्री असल्यामुळें माझ्या मित्राला आपलें कौशल्य (!) दाखविण्याची सुसंधी मी ताबडतोब आणून दिली. परंतु काय ? शेवटीं व्हायचें तेंच झालें. अविचारानें तोंडावाटे बाहेर काढलेले बोल अखेर फोल ठरलेच !

कोणतीहि गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्यानंतर अगर त्याविषयीं ऐकल्यानंतर 'त्यांत काय आहे ?' असा शेरा मारण्याची बढाईखोर प्रवृत्ति अलीकडे फार दिसून येते. 'त्यांत काय आहे ?' असें म्हणतांना म्हणणाराचा दुसऱ्यावर आपली छाप पाडण्याखेरीज दुसरा कोणताही हेतू नसतो.

त्यांत ' कांहींतरी ' होतें म्हणूनच वाल्मिकीनें रामायणासारखा प्रचंड धर्मग्रंथ निर्माण केला. शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापनेचा आपला प्रयत्न यशस्वी करून आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेवलें त्याचें तरी कारण काय ? आपल्यावर राज्य करणारे इंग्रज आपल्याला स्वराज्य द्यायला कां तयार होत नाहींत ? तर त्यांत ' कांहीं तरी ' आहे म्हणूनच ना ?

कोणत्याही गोष्टींत जर कांहींच स्वारस्य नसतें तर मनुष्यप्राणी नुसता ' गुळाचा गणपती ' बनला असता, परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. मनुष्य-प्राणी आपलें जीवन अधिक सुखाचें व्हावें, जगांत आपल्याला मानाचें स्थान प्राप्त व्हावें, अल्प प्रमाणांत का होईना पण आपल्या हातून समाजसेवा घडावी म्हणून खटपट करीत असतोच.

त्यांत सर्वांनाच यश येतें असें नाहीं. परीक्षेला बसलेले सारेच उमेद-वार पास होतात असें कोठें आहे ? पण त्या दृष्टीनें प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

अशाप्रकारें मनुष्याला जीवनाशीं झगडतांना पाहिलें कीं मग मात्र प्रत्येक गोष्टींत ' कांहीं तरी ' आहे खास असें मनाला वाटूं लागतें व तें ' कांहीं तरी ' मिळविण्याचा आपण प्रयत्न करूं लागतो.

' त्यांत काय आहे ? ' असें म्हणणारा माझा मित्र मात्र खरोखरच ' त्यांत काय आहे ? ' हें पाहण्याकरितां—शोधून काढण्याकरितां घरीं धनुष्य—बाण तयार करून तिरंदाजीचे प्रयोग करीत असतो.

याकरितां प्रत्येकानें ' त्यांत काय आहे ? ' असा शेरा मारण्यापूर्वी त्यांतलें जें कांहीं इंगित आहे तें पूर्णपणें हस्तगत करून अगर जाणून घेणें आवश्यक आहे. नाहींतर माझ्या मित्राप्रमाणें नुसतें ' त्यांत काय आहे ? ' असे उद्‌गार काढून पैज हरण्याचा प्रसंग मात्र वारंवार आल्या-खेरीज राहणार नाहीं.

१०–९–१९३९

## सागर आणि अंतःकरण : २ :

सायंकाळच्या वेळीं समुद्रकिनाऱ्यावर प्रसन्न अंतःकरणानें इकडे तिकडे फिरत होतों मी. ती मुंबई चौपाटी नसल्यामुळें त्या ठिकाणीं भेळवाल्यांचीं दुकानें थाटलेलीं नव्हतीं, कीं 'कुलपी मलाई' विकणारे फेरीवालेही दिसत नव्हते. 'जल-थंडा'ची आरोळी ठोकून हातांत पाण्याचा तोबरा व चंबू घेऊन लगबग चालणारे पुरभय्ये आढळत नव्हते, कीं गळ्यांत पत्र्याची पेटी अडकवून 'पानबिडी माचीस'ची ललकारी देणारे पानपट्टीचे फिरते दुकानदारही दिसत नव्हते. फिरणारांचीं मनें आकर्षित करून घेणारे जादुगार हजर नव्हते, कीं लहानशाच जनसमुदायापुढें आपली व्याख्यानाची हौस भागवून घेणारे हौशी व्याख्याते नव्हते. वाळूचे किल्ले बांधून आनंद लुटणारी चिमुकली बालसेना नव्हती, कीं 'हुतुतु' खेळणारे लहानथोर मंडळींचे कळपही नव्हते. पाठीवर शेपटे सोडलेल्या, रंगीबेरंगी तलम पातळें परिधान केलेल्या तोंडाला रंगसफेतीचा उजळा दिलेल्या, लगबगीनं चालत असतां मैत्रिणींच्या घोळक्यांतून मोठमोठ्यानें वादविवाद करणाऱ्या किंवा आपल्या प्रियकरासमवेत गुलगुल गोष्टी करीत गजगतीनें चालणाऱ्या तरुणीही फिरायला आलेल्या नव्हत्या.

मी फिरायला आलों त्यावेळीं समुद्रकिनाऱ्यावर जेमतेम वीस पंचवीस लहानथोर माणसें दिसत होतीं. गांवांतील नियमित फिरायला येणारे चारपांच 'पेन्शनर्स' सोडले तर बाकीचीं गांवांत दुसरें कांहीं पाहण्यासारखें नाहीं म्हणून पाय मोकळे करण्याकरितां आलेली माझ्यासारखी पाहुणे मंडळीच होती.

वर सांगितलेलीं कोणतींच आकर्षणें नसल्यामुळें दृष्टी साहजिकच निसर्गाकडे धांव घेई. समुद्रकिनाऱ्यावर दूरवर आकाशाला भिडणारीं सुरूंची उंच उंच झाडें दिसत होतीं. सायंकाळची वेळ असल्यामुळें अस्तास जाणारा दिनमणि एखाद्या सुवर्णगोलाप्रमाणें दिसत होता. सर्व आकाश सोनेरी मुलामा दिल्याप्रमाणें भासत होतें. आणि सागराच्या लाटांचें नृत्य स्वैरपणें चाललें होतें.

समुद्राच्या पाण्यांतच मी कांहीं वेळ उभा होतों. लाट किनाऱ्याकडे येऊन पुन्हां परत जाऊं लागली कीं पायाखालची वाळू हळुहळू सरकूं लागे आणि पायाखालीं गुदगुल्या होत. पांचदहा मिनिटें हा आनंद मी उपभोगीत होतों.

समुद्रांतच दूरवर कांहीं गलबतें चाललेलीं होतीं. लहान लहान होडक्यांही मधून मधून दिसत होतीं. तीं गलबतें, तीं होडक्यां, दिवसभर चारा खाऊन घरीं परतणाऱ्या गाईगुरांप्रमाणें एकामागून एक संथपणानें चालल्याप्रमाणें भासत होतीं.

लाटाच्या सपाट्यांत सांपडून हेलकावे खाणारीं तीं गलबतें, त्या होड्या पाहून माझ्याही अंत:करणाला हेलकावे बसत होते. लाट आली कीं तीं वर फेंकलीं जात अन् क्षणांत लाट ओसरतांच तीं बुडतात कीं काय अशी क्षणभर भीतिही वाटूं लागे.

सागर आणि अंत:करण !

माझ्या मनांत विचारांची मालिका सुरू झाली.

सागरावर स्वैरपणानें नृत्य करणाऱ्या लाटा—

अंत:करणांत आंदोलणारे विचार.

शात भासणारा सागर केव्हा उसळेल त्याचा कांहीं नेम नाहीं.

सागरावरील वादळाचं स्वरूप दृश्य असतं परंतु अंत:करणांतील ?

सागर आणि अंत:करण ! !

सागराच्या लाटांपेक्षांही विचारांनीं गर्दी केली होती माझ्या मनांत !

सागराच्या विशाल उदरांत अगणित अमोल रत्नें दडवून ठेवलेलीं असतात; अंत:करणांत असंख्य उदात्त विचार डोकावत असतात.

सागरांतील खडकामुळें, जलचर प्राण्यांमुळें जसे आगबोटींना अपघात होतात तसेच अंतःकरणांतील कुविचारामुळें कित्येकांच्या प्राणावर बेतण्याचीही मजल जाते.

सागराची खोली किती आहे हें जसें सहज अजमावतां येत नाहीं त्याचप्रमाणें अंतःकरणाचाही ठाव नेमका लागणे अशक्यच असतें.

सागराच्या पृष्ठभागावर लाटांचा धिंगाणा तर अंतःकरणांतही भावनांचा नाच.

सागर खवळला तर मोठमोठ्या आगबोटींना चुटकीसरशी जलसमाधि मिळते, दशदिशांत हाहाःकार उडतो.

अंतःकरणांतली खळबळही कांहीं कमी नसते. महत्त्वाकांक्षेनें अंतःकरणांत प्रवेश केला कीं तें साऱ्या जगाला 'दे माय धरणी ठाय' करूं शकतें हें शिकंदर, नेपोलियन, हिटलर वगैरे धाडशी वीरांच्या चरित्रांवरून सहज दिसून येईल.

सूर्यनारायणानें पाहतां पाहतां जलसमाधि घेतल्यामुळें माझी विचार-मालिका खळ्कन तुटली. जें ठिकाण आतांपर्यंत प्रकाशमान दिसत होतें त्यावर रजनीदेवीनें आपली काळी दुलई पसरल्यामुळें तें थोडेसें भयाण दिसूं लागलें.

इतक्या वेळ मी मोठ्या आनंदानें समुद्रकिनाऱ्यावर फिरण्याचें सुख अनुभवित होतों. पण आतां—

आनंद–दुःख !

आशा–निराशा !

सृष्टीच्या खेळांत याच गोष्टी अनुभवायला मिळत नाहींत काय !

माझी विचार-मालिका पुन्हां सुरू झाली.

घरची वाट चालत असतांच मीं मागें वळून पाहिलें. समुद्रावर आलों त्या वेळचें दृश्य आणि परत जातांना दिसणारें दृश्य यांत केवढा फरक होता !

लाटांचें नृत्य मात्र पूर्वीप्रमाणेंच स्वैरपणानें चालूंच होतें.

१८–१२–१९४२

## आशा : ३ :

किती आनंद झाला मला माझ्या मित्रानें ती बातमी सांगतांच ! त्याच्याशीं बोलतां बोलतांच मी कल्पनेचे इमले उठवायलाही सुरवात केली मनांतल्या मनांत. घरीं परत येतांच मोठ्या प्रसन्न अंतःकरणानें समोरच टांगलेल्या श्रीदत्तात्रेयाच्या तसबिरीला वंदन केलें व त्याचे शतशः आभारही मानले.

परंतु दुसऱ्याच दिवशीं माझा आनंद पार मावळला. आशेची निराशा झाली. अंतःकरणाला आनंद देणाऱ्या सुखाच्या शीतल लहरी नाहींशा होऊन दुःखाचे चटके बसूं लागले.

त्याचें असें झालें—

मी लिहिलेल्या माझ्या पहिल्या वहिल्या कादंबरीच्या शिल्लक राहिलेल्या प्रती एकदम खरेदी करणारे एक गिऱ्हाईक माझ्या मित्रानें गांठलें होतें. माझें तें पहिलेंच प्रकाशित पुस्तक असल्यामुळें त्याचा बराचसा खप मित्रमंडळींना व आप्तेष्टांना 'सप्रेम भेटी' देण्यांतच झाला होता. शिवाय धंद्यांत लागणाऱ्या व्यवहार ज्ञानाचा आमच्या डोक्यांत अभाव असल्यामुळें निरनिराळ्या पुस्तक-विक्रेत्यांनीं त्याचा पुरेपूर फायदा घेतला होता. त्यामुळें पुस्तकाचा खर्च कांहीं केल्या वसूल झाला नव्हता. तेव्हां मित्राच्या त्या बातमीनें पैसे वसूल होण्याची संधी चालून आलेली पाहून मला अत्यानंद झाला असल्यास नवल काय ! पण—

ठरल्याप्रमाणें व्यापारी कांहीं आला नाहीं. पुस्तकाचे गठ्ठे जागचे हलले नाहींत अन् माझा खिसाहि नोटांनीं भरला नाहीं. ठरलेल्या

वेळेच्या नंतर एक तासभर त्याची वाट पाहून मी अगदीं कंटाळून गेलों. शेवटीं तो विसरला असेल, पैशाचें जमलें नसेल, उद्यां येईल अशी आशा बाळगून मी आपल्या उद्योगाला निघून गेलों.

रात्रीं मित्रानेंच मला येऊन त्याचा पुस्तकें घेण्याचा बेत रद्द झाल्याचें सांगितलें आणि माझ्या अंतःकरणांतील आशेचा अंकूर अगदीं समूळ उपटून टाकला.

रात्रीं कांहीं केल्या कादंबरीचें पुढील प्रकरण मला लिहावेसें वाटेना. मनाला वाटे याही कादंबरीची गत पहिल्याप्रमाणेंच होणार नाहीं कशावरून? परीक्षेंत एकदां नापास झालेल्या विद्यार्थ्याला 'पुन्हां मी नापास तर होणार नाहीं?' हा प्रश्न एकसारखा भेडसावून त्याला नाउमेद करीत असतो तसेंच 'याही वेळेला माझी निराशा होणार नाहीं ना!' हा प्रश्न मला माझ्या आंखलेल्या कार्यक्रमापासून परावृत्त करीत होता.

संध्याकाळपर्यंत मला केवढी आशा वाटत होती! काल रात्रीं घरीं येतांच मोठ्या आनंदानें आणि उत्साहानें मी कादंबरी लेखनाला सुरवात केली. इतकेंच नव्हे तर रात्रीं बिछान्यावर पडलों असतां, ती कोठें छापावयाची, कागद कसला वापरावयाचा, प्रस्तावनेकरितां कोणत्या प्रथितयश साहित्यिकाला विनंति करायची, कव्हरवरील चित्र कोणत्या चित्रकाराकडून काढून घ्यायचें, एजन्सी कोणाला द्यायची, कमिशन काय द्यायचें, जाहिरात कोणकोणत्या वर्तमानपत्रांत किती वेळां द्यायची वगैरे सर्व कूट प्रश्नांचीं उत्तरें देखील मी चुटकीसरशीं तयार ठेवलीं होतीं. पण—

कादंबरी लेखन सुरू करण्याकरितां मी वही घेऊन बसलों. माझ्या दोन मनांचा झगडा सुरू झाला. एक मन म्हणे, "बाबारे, कशाला या

नसत्या फंदांत पडतोस? एकदां अनुभव घेतलास. आतां पुरे कर तुझी ही साहित्यसेवा."

याचा परिणाम माझ्यावर होतो न होतो तोंच दुसऱ्या मनाची टोंचणी सुरू होई. तें म्हणें, "तुला साहित्यिक व्हायचें आहे ना? मग तुला धाडस केलें पाहिजे. No risk, no gain, हें तत्त्व लक्षांत ठेव. एकदां डाव उलटला म्हणून पट कोणी उधळून का लावतो! त्या कोळ्याची कविता तुला माहीत आहे ना! कशाला शिकलास ती लहानपणीं! मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग मार्गदर्शनाकरितां करायचा नाहीं तर त्या ज्ञानाचा फायदा तरी काय? चल प्रयत्न कर. आशेला प्रयत्नाची जोड दे. यश लिहिलेलेंच आहे तुझ्या ललाटीं."

या दोन मनांच्या झगड्यांत दुसऱ्या मनानेंच माझ्यावर विजय मिळविला. त्या मनाचें वक्तव्य मला पटलें. मनुष्यानें नेहमीं आशावादी असलें पाहिजे. पुढील सुखाशेवर नजर टेवूनच मनुष्याच्या हातून मोठमोठे पराक्रम होत असतात. जीवनांतून आशेचें उच्चाटन झालें तर जीवन नीरस झाल्याविना खास राहाणार नाहीं.

आयुष्याच्या वृद्धापकाळांत सुखानें काळ कंठतां यावा या आशेवरच मनुष्य तारुण्यावस्थेंत अहोरात्र कष्ट करून जीवनाची पुढील तरतूद करून ठेवतो.

जगाच्या आखाड्यांत उतरल्यानंतर आपल्याला हार खावी लागूं नये एवढ्या आशेवरचा विद्यार्थी ज्ञानार्जन करीत असतो.

निरनिराळे व्यापारी मंदीच्या दिवसांतही पुढील नफ्याच्या आशेवर नजर टेवूनच आपला व्यापार टिकवून धरतात.

एखादा नवशिका लेखक आपले लेख 'साभार परत' येत असतांही लेखनसंन्यास कां घेत नाहीं? तर त्यालाही केव्हांतरी आपला लेख छापून येईल ही आशा असते म्हणूनच ना?

निवडणुकींत पडलेला उमेदवार संधी सांपडताच पुन्हां उभा राहतोच कीं नाहीं ?

एखाद्या नांवाजलेल्या खेळाडूला तो एखाद्या सामन्यांत चमकला नाहीं म्हणून कांहीं त्याला अर्धचंद्र देण्यांत येत नाहीं; याचें तरी काय कारण ? तर तो पुन्हां आपली चमक दाखवील ही आशाच त्याच्या बुडाशीं नसते काय ?

जगांत हल्लीं जें महायुद्ध लढलें जात आहे, असंख्य मानवी जीवांचा संहार होत आहे. हें सर्व कशाकरितां ? महायुद्धानंतर 'नवें जग' निर्माण होऊन जीवनाला स्थैर्य प्राप्त होईल या आशेवरच नाहीं काय !

आशा-जीवन !

—मीठ नसलेला पदार्थ जसा बेचव लागेल तसेंच आशा नसेल तर जीवन अळणी होईल, त्यांत स्वारस्य वाटणार नाहीं.

माझीं पुस्तकें संपण्याची आशा जर मला त्या दिवशीं वाटली नसती तर माझ्या हातून दुसऱ्या कादंबरीच्या लेखनाला सुरवात झाली असती कीं नाहीं कोण जाणें ! परंतु दुसऱ्या मनानें केलेल्या उपदेशाप्रमाणें मला आतां बरीच आशा वाटूं लागली आहे यांत मुळींच संदेह नाहीं.

१-११-१९४२.

## परिस्थिति : ४ :

बऱ्याच वेळेला परिस्थितीबद्दल निरनिराळ्या माणसांकडून निरनिराळे उद्गार ऐकायला मिळतात. एक म्हणतो, 'अरेरे! काय परिस्थिति ही! घरांत दाणागोटा नाहीं अन् पदरीं चार मुलंबाळं. काय करायचं आतां?' दुसरा म्हणतो, "कोणत्या मुहूर्तावर प्रवासाला निघालों आणि अशा या परिस्थितींत सांपडलों! गाडीचा डबा अडगळीच्या खोलीप्रमाणें ठासून भरला आहे नुसता." तिसरा म्हणतो, "काय त्या वेळची परिस्थिति होती राव! नुसता श्रीमंतींत लोळत होतों. पक्वान्नाशिवाय जेवण नाहीं, सिल्कच्या कापडाखेरीज दुसऱ्या कापडाचा अंगाला स्पर्शहि होऊं दिला नाहीं, मोटारगाडीशिवाय कधीं बाहेर पडलों नाहीं, कीं 'शो' पाहिल्या-शिवाय झोंप घेतली नाहीं. पण आतां काय? सारी परिस्थिति बदलली बरं!"

या सर्वांच्या बोलण्यांत एकच सूर दिसून येतो आपल्याला. प्रत्येक-जण स्वतःला अगदीं निर्दोष समजून सर्व दोषांचें खापर परिस्थितीवर फोडत असल्याचें दिसून येतें.

परंतु परिस्थिति! परिस्थिति! म्हणून जो आपण तिच्या नांवानें टाहो फोडतो ती आहे तरी काय? ती कशी उत्पन्न होते? तिच्यामुळें सुख किंवा दुःख मनुष्याला कां भोगावें लागतें? या प्रश्नांचा आपण कधींच विचार करीत नसतों.

परिस्थिति म्हणजे प्रत्येकाच्या बऱ्यावाईट कृतीचें फळ-परिणाम असें म्हटल्यास कांहींच वावगें होणार नाहीं.

एखाद्या माणसानें नेकीनें धंदा करून बराच पैसा मिळविला आणि तो जर व्यवस्थित वागला तर तो आपल्या कुटुंबाचें पालनपोषण उत्तम तऱ्हेनें करूं शकेल, समाजांत त्याला मानमान्यता मिळेल आणि त्याचा नांवलौकिक होईल; म्हणजेच तो चांगल्या परिस्थितींत आपलें जीवन कंठू लागेल.

दुसरा एखादा मनुष्य बराचसा पैसा कमवील परंतु त्याचा योग्य मार्गाकडे विनियोग न करतां तो जर वाटेल तसा उधळूं लागेल तर तो लवकरच भुकेकंगाल होईल, समाजांत त्याचा दुर्लौकिक होईल व अशा प्रकारच्या त्याच्या वागणुकीमुळें त्याला बिकट परिस्थितींत खितपत पडावें लागेल.

माझा एक मित्र आहे. मध्यंतरीच्या लढाईच्या धामधुमींत त्याला, मुलांची संख्या कमी झाल्यामुळें, शाळेंतून कमी करण्यांत आलें. त्याच्या इष्टमित्रांना व नातलगांना जरा धक्काच बसला. कारण तो कांहीं सडा-एकटा नव्हता. त्याच्यावर कुटुंबाची जबाबदारी होती. परंतु तो पठ्ठ्या नोकरी गेली तरी दुसरीकडे नोकरीची खटपट वगैरे कांहीं न करतां जणूं कांहीं आपण रजेवरच आहों अशा थाटांत राही. दोन वेळां जेवी, दुपारची वामकुक्षी घेई, निरनिराळीं मासिकें, कादंबऱ्या आणून वाची, फिरायला जाई, नोकरी गेल्याचें त्याच्या खिजगणतींतही नव्हतें.

परंतु त्याचें हें करणें, वागणें योग्य होतें काय? मुळींच नाहीं. जवळची पुंजी संपेपर्यंत तो असा चैनींत, निष्काळजीपणें राहिला असता; परंतु नंतर मात्र तो परिस्थितीच्या नांवानें शंख केल्यावांचून राहिला नसता हें निश्चित !

तरूण-तरुणी जेव्हां एकमेकांवर प्रेम करूं लागतात, तेव्हां एक-मेकांच्या जातीचा, श्रीमंतीगरिबीचा, स्वभावसाधर्म्याचा विचार करतातच

असें नाहीं. अन् मग लग्नाला कोणी आडकाठी केली की घरच्या परिस्थितीच्या नांवानें खडे फोडतात.

परंतु अशी परिस्थिति निर्माण करायला आपली स्वतःचीच वागणूक–कृतीच कारणीभूत होत नसते काय?

ज्याच्या पदरीं चार कच्चीबच्चीं आहेत त्यानें घरांतील दाणागोटा संपेपर्यंत कां वाट पहावी! तो संपण्याच्या आगोदरच त्यानें कांहींतरी हालचाल करावयास पाहिजे होती. आणि तसें तो करता तर परिस्थिती-विरुद्ध ओरड करायची त्याला जरूरच पडली नसती.

प्रवासाला निघालेला मनुष्य गाडींतील गर्दी पाहून परिस्थितीच्या नांवानें हाकाटी करतो. गाडींतल्या गर्दीचा त्रास सहन न होण्याइतका जर तो दुबळा आहे तर त्यानें वरच्या वर्गाचें तिकीट काढून आरामांत प्रवास करायला काय हरकत होती? पण पैसे तर जास्त खर्चायला नकोत अन् सुखकारक प्रवास मात्र घडायला पाहिजे अशी दुहेरी अपेक्षा नेहमींच फलद्रुप होईल असें नाहीं हें त्यांनीं लक्षांत घ्यायला पाहिजे.

त्याचप्रमाणें पूर्वीच्या उत्तम परिस्थितीच्या गोड आठवणी काढून वाईट परिस्थिति कधींच बदलणार नाहीं. परिस्थितींत बदल घडवून आणायचा असेल तर कांहींतरी योग्य मार्गाचाच अवलंब करायला पाहिजे. मागील आठवणींचा पाढा वाचून उलट मनाला त्रास मात्र होईल.

तेव्हां नुसतें परिस्थितीच्या नांवानें ओरड करून परमेश्वराला किंवा इतरांना दोष देण्यांत मुळींच अर्थ नाहीं. दोष द्यायचाच झाला तर तो स्वतःलाच दिला पाहिजे, कारण ती परिस्थिति आपण होऊन ओढवून आणलेली असते.

२३–१–१९४३

मला जरा आश्चर्यच वाटलें अशा संध्याकाळीं त्याला नाक्यावर उभे राहतांना पाहून ! माझा समज चुकीचा असेल, मागसासारखीं माणसें पुष्कळ दिसतात. म्हणून मी जरा उभे राहून वळून नीट त्याच्याकडे पाहिलें. माझी खात्रीच झाली. माझा जुना मित्र दिनू देशपांडेच होता तो.

त्याचा पोषाख नीटनेटका केलेला असून हातांत वकिली थाटाचें एक लेदर पॅकेट होतें. दिनू एका कापडाच्या दुकानांत सेल्समनची नोकरी करीत होता. सायंकाळची वेळ म्हणजे दुकानदारांची लग्नघाईच ती ! अशा वेळीं त्याला फिरतांना पाहून बहुतेक त्यानें नोकरीला 'रामराम' ठोकला असावा असा मी तर्क केला. माझ्या तर्कालासुद्धा तसेंच सबळ कारण होतें. आतांपर्यंत त्यानें मोटारड्रायव्हर, वायरमन, स्टोपीन्स, काकडे विकणारा फेरीवाला, तयार कपडे, धोतरजोड्या वगैरे माल विकणारा फिरता दुकानदार, कॅपडेपोमध्यें सेल्समन, वगैरे अनेक धंदे व नोकऱ्या केल्या होत्या. आणि ज्या ज्या वेळीं त्याची माझी गांठ पडे तेव्हां बहुतेक त्याचा धंदा बदललेला असावयाचा किंवा तो निदान बदलण्याच्या विचारांत असावयाचा.

" काय दिनोबा, पुन्हां वकिली सुरू केली वाटतं ? " मी मुद्दामच त्याची थट्टा करण्याच्या हेतूनें प्रश्न केला.

" छे, छे ! आज 'सण्डे' आहे आमचा ! " दिनू भिवया उडवीत म्हणाला.

माझ्या प्रश्नाचा रोख त्याच्या लक्षांत आला हें त्यानें दिलेल्या उत्तरावरून मी ताडलेंच. ‘ गुमास्ता कायदा ’ पास झाल्यापासून दुकानांतील नोकरांना आठवड्यांतून एक हक्काची सुटी मिळूं लागली होती आणि ती रजा आज कडक इस्तरीचे कपडे घालून मोठ्या रुबाबांत फिरून दिनू उपभोगीत होता.

“ मला वाटलं कीं स्वारीनं दुसऱ्या धंद्यांत पदार्पण केलं. ” मी त्याला त्याच्या स्वभावाची आठवण देत म्हणालों.

“ नाहीं रे बुवा ! अगदीं आहे तेंच. मागील पानावरून पुढें चालू ” दिनू उत्तरला.

“ पण आतां मजा आहे कीं नाहीं या नोकरींत ? आयुष्यांत तुला आतां ‘ राम ’ वाटूं लागला कीं नाहीं ? ’ मी प्रश्न केला त्याला.

“ छे रे बाबा, धंद्यासारखा ‘ राम ’ नाहीं या नोकरींत, ” दिनूनें नेहमींप्रमाणें कुंथायला सुरुवात केली. “ किती झालं तरी ही गुलामगिरी. शिवाय मिळकत यथातथाच ! ”

दिनूचें हें उत्तर ऐकून मी बांधलेला अंदाज खरा ठरल्याबद्दल मला समाधानच वाटलें. जेव्हां तो फेरीचा स्वतंत्र धंदा करी तेव्हां त्याला आम्हां नोकरवर्गाकडे पाहून आपण धंद्यांत पडल्याबद्दल पश्चात्ताप होत असे. मिळकतीच्या बाबतींत तीच रड. “ नोकरांना काय पहिली तारीख उजाडली कीं पगार पडलाच हातांत. तसं कांहीं धंद्यांत नाहीं. आज पन्नास रुपये विक्री तर उद्यां पन्नास पैसेही दिसण्याची मुष्कील.” अशी तो त्यावेळीं ओरड करीत असे. आज ऐकतों तों त्यानें पुन्हां पगडी फिरवली व धंदाच बरा असें त्याला वाटूं लागलें.

त्याच्याशीं इकडच्या तिकडच्या चार गप्पा झोंकून मी माझ्या कामाला सटकलों. वाटेंत दिनू देशपांडेबद्दलचेच विचार सारखे

येत होते. त्याची ती अस्थिर मनोवृत्ति पाहूनच मला त्याची थट्टा कराविशी वाटली. परंतु विचारांतीं त्याच्या बोलण्यांत यत्किंचितही चूक नसल्याचें मला आढळून आलें.

त्याची अशी विचारसरणी असणं हा खुद्द त्याचाच दोष नसून अनादिकालापासून मानवी मनांत मुरलेल्या असमाधानी वृत्तीचा तो परिणाम आहे. मनुष्य प्राण्याची प्रवृत्तीच अशी आहे कीं, प्राप्त परिस्थितींत तो कधींही समाधान मानून राहूंच शकत नाहीं. त्याला नेहमीं बदल पाहिजे असतो.

दररोजच्या जेवणाचेंच उदाहरण घ्या. आपण एक भात, भाकरी किंवा चपातीच खाऊं म्हटलें तर तें आपल्याला जमणार नाहीं, रुचणार नाहीं अन् मानवणारही नाहीं. तर त्याच्या भोंवतीं आमटी, भाजी, चटणी कोशींबीर, दहीं वगैरे पदार्थ लागतातच. वास्तविक पाहतां भात भाकरी किंवा चपाती हेच जेवणांतले मुख्य पदार्थ. परंतु रुचिपालट म्हणून इतर पदार्थांची सांगड घातल्याविना जेवणाचें कार्य मनपसंत पार पडूं शकत नाहीं हा अनुभव सर्वांना असेलच.

सहा दिवस काम केल्यानंतर सातव्या दिवशीं सुटी देण्याचें तरी मर्म काय ? सुटीचे दिवशीं मनुष्यानें ठराविक चाकोरी सोडून निराळ्या मार्गानें आपला जीवनक्रम घालवावा असाच त्याच्या मुळाशीं हेतु असतो.

'उपवास' करण्याच्या पूर्वीच्या पद्धतींतसुद्धां एखाद्या दिवशीं तरी पोटाला विश्रांति मिळून मनुष्याला आरोग्य प्राप्त व्हावें हेंच तत्त्व त्यांत दिसून येतें.

बोलपटाचें युग जेव्हां हिंदुस्थानांत सुरू झालें तेव्हां त्याला कल्पनेच्या बाहेर लोकाश्रय मिळाला. मध्यंतरी फोफावलेल्या नाटककंपन्यांपैकीं

हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच कंपन्या बोलपटाशीं स्पर्धा करूं शकल्या. बाकीच्या तेव्हांच नामशेष झाल्या. याचें तरी कारण काय? मनुष्यप्राण्याची बदलती टेस्ट; नाविन्याची आवड हेंच होय!

मनुष्य प्राणी हा नाविन्याचा भोक्ता आहे. कोणतीही नवीन गोष्ट त्याला दिसून आली कीं ती हस्तगत करण्याचा प्रयत्न करतांना तो अगदीं अहमहमिकेनें पुढें सरसावत असतो. अन् यांतच त्याची असमाधानता दिसून येते.

मानवी प्राण्यांत मुरलेल्या या असमाधानी वृत्तीमुळेंच त्यानें आपली प्रगति करून घेतली आहे. ‘ जें आहे तें ठीक आहे ’ हीच वृत्ति जर तो कायम ठेवता तर जगांत आज जी सुधारणा झालेली दिसून येते तिला आपण मुकलों असतों. असें जर आहे तर माझा मित्र नोकरी सोडून धंद्याकडे वळतो आहे असें पाहून मला त्याच्या वागण्यांत चूक कां बरें वाटावी?

२८-१०-१९४२

---

## जगाची रीत

: ७ :

'घोडेवाला, पिछाडी चाबूक—'

एका लहान मुलाचे वरील कर्णकठोर उद्गार ऐकून मी एकदम थांबलों. मागें वळून बघतों तों एक व्हिक्टोरिया वेगानें दौडत चालली होती. तिच्या मागील दांड्याला धरून दोन लहान मुलें लोंबकळत विनामूल्य गाडींत बसल्याचें सुख अनुभवित होतीं. आणि त्याच गाडी-मागें तितकीच दोन लहान मुलें 'घोडेवाला, पिछाडी चाबूक' असें ओरडून व्हिक्टोरियावाल्याला संदेश पोंचवींत होतीं.

व्हिक्टोरियावाल्याला हा प्रकार कांहीं नवीन नव्हता. टवाळ मुलें बऱ्याच वेळीं आपली फसगत करतात हें तो जाणून होता. इतकेंच नव्हे तर त्यानें ते अनुभवलेंही होतें. आणि म्हणूनच त्यानें अजूनपर्यंत कांहीं त्या मुलांच्या संदेशाकडे लक्ष दिलें नव्हतें.

"घोडेवाला, पिछाडी चाबूक—" पुन्हां तेच शब्द. मला पुढें जाववेना. माझी गति एकदम कुंठीत झाली. अजूनही व्हिक्टोरियावाल्यानें आपली स्थितप्रज्ञता सोडली नव्हती.

"घोडेवाला, पिछाडी चाबूक;" पुन्हां तेच शब्द परंतु आवाज मात्र अगदीं बेंबीच्या देठापासून काढलेला.

मला मोठें नवल वाटलें. एवढासा लहान मुलगा तो. पण त्यानें आपली महत्त्वाकांक्षा सोडली नव्हती. दोन प्रयत्न फसले म्हणून कांहीं तो निराश झाला नव्हता. 'पुन्हां प्रयत्न करून पहा.' हें ब्रीदवाक्य

त्याच्या हाडींमासीं खिळलें होतें. आणि खरोखरच त्याचा हा तिसरा प्रयत्न मात्र फलद्रुप झाला.

व्हिटोरियावाल्याला आतां ही हूल नसावी, त्यांत कांहीं तरी सत्यांश असावा असें वाटलें आणि त्यानें आपल्या लांबलचक चाबकाचा एक फटकारा सपदिशीं मागें लगावला.

दोन उघडीं नागडीं पोरें तीं! उघड्या पाठीवर चाबकाचा फटकारा बसतांच बिचारीं कळवळलीं. एक तर ताबडतोब खालीं उतरलाच. आपली पाठ त्यानें चोळली. क्षणभर इकडे तिकडे पाहिलें. त्याच्या मित्रांखेरीज दुसऱ्या कुणाचेंच त्याच्याकडे लक्ष नाहीं असें पाहून त्याला जरा बरें वाटलें. त्याचे ते दोन मित्र मात्र आपण सूड उगवित्याचा आनंद मनमुराद उपभोगीत होते.

आपल्या मित्रांना हंसतांना पाहून त्यानें एकदम तोंड फिरवलें, परंतु त्याला काय दिसलें!

त्याचा जोडीदार एकटाच गाडीमागून लोंबकळत चालला होता. त्याच्यानें तें पाहवेना. आतांपर्यंत दोघांनीं मिळून ज्या सुखाचा आस्वाद घेतला तेंच सुख त्याला एकट्यालाच अनुभवितांना पाहून त्याला आपल्या दुबळेपणाची लाज वाटली. परंतु लगेच त्याचा चेहरा पालटला!

लाजलज्जादि विकाराची छटा नाहींशी होऊन त्याची जागा सूडानें घेतली. क्षणार्धांत त्याचा ठाम निश्चय झाला. आणि—

'घोडेवाला, पिछाडी चाबूक–' तो ओरडलाच.

जगांत आपल्याला अशाच मनोवृत्तीचे नमुने पाहायला मिळत नाहींत काय?

१५-३-१९४३

"हरे राम! काय उन्हाळा हा!" कृष्णाकाकांनीं पाणी पीत म्हटलें. सकाळपासून दहापांच वेळां तरी हेच उद्गार मी त्यांच्या तोंडून ऐकले होते. माझ्यानें रहावेना. मी जरा त्यांना चिडविण्याच्या उद्देशानें म्हणालों, "काका, उन्हाळ्याचेच दिवस आहेत. त्यामुळेंच उकाडा हा व्हायचाच. थंडीच्या दिवसांत तर नाहीं ना एकदम उकडायला लागलें?"

त्यांना जरा झोंबलेंच माझें बोलणें. पण माझें म्हणणें काय खोटें होतें? कोणतीही गोष्ट घ्या मनुष्यप्राणी कधीं समाधान मानून घ्यायचाच नाहीं त्यांत.

उन्हाळ्याच्या दिवसांत, 'काय उन्हाळा हा?' म्हणून कुरकूर; तर थंडीच्या दिवसांत "काय थंडी ही!" अशी थंडी उभ्या जन्मांत कधीं पडली नव्हती." असें म्हणण्याचीही यांची तयारी! प्रत्येक मनुष्य आयुष्यांत किती जन्म घेतो हें त्या जन्माला घालणाऱ्या परमेश्वरालाच माहीत!

कोठें जायचें असलें गाडीनें तरी हीच गत. 'अजून गाडी कशी आली नाहीं?' म्हणून फलाटावर उभे राहून वांकून वांकून गाडीची मार्गप्रतीक्षा करायची. वास्तविक एवढें करायची काय जरूरी? गाडीची वेळ ठरलेली असते. ती वेळेवर-बहुधा नव्याण्णव टक्के-येतेच येते. पण मनुष्यप्राण्याची कुरकुर करण्याची खोड कांहीं जात नाहीं.

मिळकतीच्या बाबतींत तीच रड! कृष्णाकाका जेव्हां कांहीं दिवस बेकार होते तेव्हां पंचविसावरसुद्धां चिकटायची त्यांची तयारी होती.

मी एकदां त्यांना सहज हटकलेंही होतें. " काका, पंचवीस रुपड्यांत हो कसें काय भागणार ? तुमचें खटलें तर फार मोठें !' तेव्हां त्यांनीं उत्तर केलें, " तात्या, अरे पंचविसांतच काय पण पंधरांतसुद्धां मी भागवून दाखवीन. अंथरूण पाहून पाय किती पसरायचे हें आम्हां जुन्या खोडांना चांगलं कळतं. कठीण जातं तें तुम्हां नव्या–नवथर तरुणांना.

तेच कृष्णकाका आज सव्वाशें रुपये महिना मिळवीत आहेत. परंतु, " पैसा पुरत नाहीं, खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां अन् देणेकऱ्यांचे वायदे चुकविण्याकरितां काय खटपटी कराव्या लागतात " अशी त्यांची हाकाटी आहे ती आहेच. अन् हेच कृष्णाकाका पंधरा रुपयांत आपल्या संसाराचा गाडा चालविणार होते.

४–४–४१

---

'कार्यसाधूपणा !' निव्वळ एखादें कार्य साधण्याकरितां आपला फायदा करून घेण्याकरितां मनुष्य जेव्हां आपल्या स्वाभिमानाला तिलांजली देतो तेव्हां मला त्याची कींव आल्याशिवाय राहात नाहीं.

माझ्या माहितीचे एक बडे गृहस्थ आहेत. निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत त्यांनीं आपल्या कार्याची चमक दाखवून मोठें मानाचें स्थान पटकविलें आहे. त्यांच्याकडे बऱ्याच जणांची 'ये' 'जा' या ना त्या कारणानिमित्त चाललेली असते. त्यांत उच्च दर्जाचे, मध्यम वर्गाचे, कनिष्ट प्रतीचे लोकही असतात. परंतु मला विशेष मजा वाटे चांगल्या मध्यम वर्गातील सुशिक्षित लोकांची. त्या गृहस्थांशीं बोलतांना या लोकांच्या प्रत्येक वाक्याची सुरवात व शेवट 'साहेब' या शब्दांनीं होई. प्रत्येक वाक्य म्हणजे घाटांतून जाणारी गाडीच ! पुढें एक एंजीन व मागें एक एंजीन. स्तुतीच्या वर्षावाबरोबरच 'साहेब' शब्दाचा वर्षावही इतक्या जोराचा होई कीं कांहीं विचारूं नका ! या संभाषणांत दुसरीही एक गोष्ट मला प्रामुख्यानें आढळली. आणि ती म्हणजे परनिंदा. या गृहस्थांच्या स्तुतीबरोबरच ह्यांच्या विरुद्ध पक्षांतील लोकांच्या निंदेचा प्रवाहही जोराचा वहात असे.

कांहीं कांहीं लोक आपलें कार्य साधण्याकरितां एखाद्या पक्षाला सामील होतात. परंतु आपलें इच्छित साधल्यानंतर किंवा त्या पक्षांत राहून तें साधणार नाहीं अशी पक्की खात्री पटतांच दुसऱ्या पक्षाला जाऊन मिळतात. आणि तीं तत्त्वें-ज्यांच्या विरुद्ध आपण ओरड करीत होतों-आपल्याला मान्य आहेत असा डंका पिटायला कमी करीत नाहींत.

मोठमोठ्या पुढाऱ्यांची, शिकल्या सवरलेल्या शहाण्यासुरत्या माणसांची जर ही अवस्था तर त्या पोष्टमननें माझ्या खिशांतून आठबारा आणे काढण्याकरितां थोडावेळ कार्यसाधूपणाचा मुखवटा धारण केला तर त्याला दोष देण्यांत काय अर्थ आहे ?

२९-१०-४३

'ए छोकरा, सबूर'—

वरील उद्गार ऐकतांच मी एकदम खिडकीच्या बाहेर वळून पाहिलें. गिरगांवांतून ट्रॅमनें मी दादरला येत होतों. भायखळ्याच्या स्टँडवर गाडी उभी राहिली होती. विरुद्ध बाजूनें गिरगांवकडे जाणारी एक ट्रॅम वेगानें येत होती. संध्याकाळची वेळ असल्यामुळें गाडी अगदीं खच्चून भरली होती. ड्रायव्हर जवळच्या लोखंडी पट्टयांवर कांहीं माणसें बसलीं होतीं. त्यापैकींच एका मुसलमान गृहस्थानें वरील शब्द उच्चारले होते.

आमच्याच ट्रॅममधून विरुद्ध बाजूनें उतरून एक बारा तेरा वर्षांचा मुलगा ट्रॅमलाईन क्रॉस करण्याच्या बेतांत होता. बिचाऱ्याला काय माहीत कीं पलीकडून ट्रॅम येत आहे. पण क्रॉस करणार इतक्यांत त्या गृहस्थानें ओरडून मुलाला सावध केलें व तो अपघात टळला.

तो मुलगा निघून गेला. ती ट्रॅमही आपला मार्ग आक्रमूं लागली, मुलाला सावध करून त्याचे प्राण वांचविणारा तो मुसलमान मियाही माझ्या दृष्टीआड झाला. आमची ट्रॅम चालत होती अन् माझें विचार-चक्रही ट्रॅमच्या वेगानें चालू होतें.

'तसें पाहिलें तर तो मुसलमान होता अन् ज्याच्यावरचें गंडांतर त्यानें टाळलें तो एक हिंदु मुलगा होता. काय जरूर होती त्यानें त्याला ओरडून सावध करायची ? दंग्याच्या वेळीं नाहीं का चाकू सुऱ्या भोसकून प्राण घेत एकमेकांचे ? मग याच वेळीं ?

ही वेळ निराळी होती. दंग्याच्या वेळीं हिंदु अगर मुसलमान एकमेकां-समोर शत्रू म्हणून उभे असतात आणि आपल्या शत्रूचा निःपात करणें हेंच त्यावेळीं त्यांचें एकमेव ध्येय असतें.

# कार्यसाधूपणा

टक् टक्–दारावर आवाज झाला. त्या आवाजानें मी एकदम जागा झालों. दिवाळीची सुटी असल्यामुळें जेवण झाल्यानंतर वामकुक्षी घेण्याचा माझा तो कार्यक्रम जवळजवळ ठरल्यासारखाच झाला होता.

झटकन उठून मी दार उघडलें. पाहातों तों दारांत पोष्टमन उभा. त्याला पाहतांच तो कां आला हें मी तात्काळ ताडलेंच. त्याच्या आगमनानें माझ्या खिशाला चाट बसणार हें मी जाणलेंच. परंतु गंमत करण्याकरितां म्हणून मी नुसता निर्विकार मुद्रेनें त्याच्याकडे पहात राहिलों.

'साहेब' मी आलों आहे.' तो म्हणाला.

'साहेब' म्हटलें कीं माझ्या आंगावर मूठभर मांस चढेल असेंच त्याला वाटलें असावें. कदाचित् त्याचा तसा अनुभवही असेल.

'दिसतो आहेस मला तूं आलेला. पण म्हणणं काय तुझं?' मी त्याला विचारलें.

'म्हणणं काय असायचं साहेब? दिवाळी आहे' अजूनही तो आपली गाडी रुळावर आणीना.

'आहे ना! छान आहे ही यंदाची दिवाळी! 'मावाप' सरकारनं दिवे लावायची परवानगी दिली आहे. जिकडे तिकडे नुसता प्रकाश दिसतो आहे दोन दिवस.' मीही मुद्दामच मुख्य मुद्यापासून दूर नेत होतों त्याला.

पण माझ्या या बोलण्यामुळें त्यानें माझ्या डोक्यांत प्रकाश [illegible] पडणार नाहीं हें जाणून आपल्या मुद्याकडे वळण्याचें ठरविलें.

‘ साहेब, तें खरं आहे तुमचं म्हणणं ! मी आलों आहे या वर्षाचं ‘ पोस्त ’ मागायला.’ तो म्हणाला.

‘ असं होय ? मग अगोदरच बोलायचं कीं नाहीं तसं ?’ इतकें बोलून मी पैसे आणण्याकरितां घरांत वळलों.

‘ साहेब, एकटेच आपण ? अन् त्या पत्ता देणाऱ्या वहिनी कुठं आहेत ?’ त्यानें आस्थेनें चौकशी केली.

त्याचा प्रश्न ऐकून मला मोठी मजा वाटली. आपल्याला आतां प्राप्ती होणार या आशेमुळें त्यानें लगेच नातेंहीं जोडून टाकलें. त्याची ‘वहिनी’ म्हणजे माझी सौभाग्यवती. माझ्या पुस्तकांच्या पैशाच्या मनिऑर्डरी तो घेऊन येई. त्याची आणि माझी गांठ कधींच पडत नसे. त्यामुळें सौ. त्याला माझ्या ऑफिसच्या पत्त्यावर मनिऑडर पाठविण्यास सांगे व पत्ता लिहून देई. हा कार्यक्रम नेहमींचा असल्यामुळें त्यानें तिचें नांव ‘ पत्ता देणाऱ्या वहिनी ’ असेंच ठेवलें.

‘ त्या बाहेर गेल्या आहेत.’ असें म्हणून मी त्याच्या हातावर एक अधेली टाकली. हातांतल्या अधेलीकडे व माझ्याकडे आळीपाळीनें पाहात तो म्हणाला, ‘साहेब, दोघंजणं आहोंत आम्ही.’

‘अरे, तुम्हीं दोघंजणं आहांत पण मी एकटाच आहें ना ? अजून बाकीच्या हक्कदारांना द्यावें लागेलच ना ?’ असें म्हणून त्याच्या हातावर मी आणखी एक पावली टाकली. काम फत्ते होतांच विजयी मुद्रेनें सलाम करून तो निघून गेला.

मला मोठें नवल वाटलें. एरवीं एकाद्यानें ‘ आमचं पत्र आहे का ? असें विचारतांच त्याच्याकडे पाहिलें न पाहिलेंसें करणारा, पुन्हां विचारल्यास चढेलपणें उत्तरें देणारा, नेहमीं ऐटींत राहणारा, चालणारा, व ताठरपणानें वागणारा हा पोस्टमन आज एकाएकी मेणासारखा मऊ लवचीक कसा बनला ? कारण एकच ! त्याला माझ्याकडून ‘ पोस्त ’ उकळायचें होतें. निव्वळ आपलें कार्य साधण्याकरितांच त्यानें हा कार्य-साधूपणाचा ‘ मुखवटा ’ धारण केला होता.

विकणाऱ्या भय्याजीचे, ' चन्ना जोर गरम मै बाबू लाया मजेदार ' हें पद सुरू झालें. प्रेमवीरानेंही त्याची साथ करायला सुरवात केली. तो गाणें गुणगुणून स्वस्थ राहातां तरी हरकत नव्हती. परतु गाणें गुणगुणत असतांनाच मधून मधून जें पार्श्वसंगीत ऐकूं येई त्यांतील वाद्यांची माहिती तो आपल्या मित्राला पुरवीत होता. चित्रपटांतील बहुतेक पदांची साथ तो न चुकता करीत होता.

संवाद, अभिनय यांतील बारीकसारीक गोष्टीही तो समजावून सांगत होता. जें जें घडत होतें त्याबरोबरच पुढें काय होणार तेंही गोष्टीरूपानें सांगून चित्रपट पाहावयास आलेल्या सभोंवतालच्या प्रेक्षकांचा तो रसभंग करी.

त्याच्या एकंदर प्रकारावरून त्याचा मित्र कोणीतरी खेडवळ असावा व चित्रपट पहाण्याची त्याची ही पहिलीच वेळ असावी असा मी अंदाज बांधला होता. परंतु ' मध्यांतरांत ' थिएटरमध्यें प्रकाश पडतांच त्याचा ' शेजारमित्र ' पाहून माझ्या डोक्यांतही लख्ख प्रकाश पडला. त्याच्या शेजारी एक सतरा अठरा वर्षांची सुंदर युवती बसलेली होती. तिच्या एकंदर रुबाबावरून ती कॉलेज कन्यका असावी असा तर्क करणें मुळींच चुकीचें ठरलें नसते.

अशा सुशिक्षित लोकांनीं चित्रपट पहात असतां आजूबाजूला बसलेल्या प्रेक्षकांची तमा न बाळगतां मोठमोठ्यानें मनमानेल तशी चर्चा करावी ही मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे.

एखाद्यावेळीं कथानकांतील गुंतागुंतीमुळें कांहीं प्रसंगाचें आकलन सामान्यबुद्धीच्या माणसाला होणें शक्य नसतें. पण अशा वेळीं आपण जरा खालच्या आवाजांतच त्याला समजावून दिलें पाहिजे. आपल्या

बोलण्यामुळें शेजारच्या प्रेक्षकाला उपसर्ग पोंचणार नाहीं ही खबरदारी प्रत्येकानें घेतली पाहिजे.

त्याबरोबर पुढील कथानक अगोदरच समजावून सांगणें म्हणजे गौप्यस्फोट करण्यासारखें आहे. प्रेक्षकांनीं कथानकाबरोबर आपल्या कल्पनेचा प्रवासही चालू ठेवावयाचा असतो. त्या कल्पनाप्रवासाला, एखाद्या प्रेक्षकानें आगाऊच पुढील माहिती सांगितल्यामुळें एक प्रकारचा अडथळा होऊन शिवाय रसहानीही होते.

प्रेक्षक चित्रपट दोन हेतूंनीं पाहात असतो. पहिला हेतु म्हणजे मनरंजन व दुसरा शिक्षण. मनरंजनाबरोबरच चित्रपटांतून समाजाला शिक्षण देण्याचाही एक हेतु असतो हें विसरून चालावयाचें नाहीं. वरील दोन्ही हेतु जर सिद्धीस न्यावयाचे असतील तर प्रत्येक प्रेक्षकानें चित्रपटगृहांत चित्रपटाशीं समरस झालें पाहिजे. आणि ही समरसता सर्व प्रेक्षकांनीं शांतपणें चित्रपट पाहण्याचें स्वतःवर 'बन्धन' घालून घेतल्यासच शक्य आहे नाहीं का ?

१०-९-१९४१.

— —

कौरवपांडव नाहीं का एकमेकांशीं लढले? तसा विचार केला तर त्यांचा नात्याचा, रक्ताचा संबंध असूनही केवळ आपल्या तत्त्वाकरितां, महत्त्वाकांक्षेकरितां, त्यांनीं नात्यागोत्याची तमा न बाळगतां एकमेकांचे बिनदिक्कत प्राण घेतले, एकमेकांना कंठ-स्नान घातलें.

परंतु तो मुसलमान गृहस्थ जेव्हां ओरडला तेव्हां तो आपली आणि त्या मुलाची जात एकच समजत होता. अन् ती म्हणजेत मानवजात! एका मानवानें दुसऱ्या मानवाचे प्राण वांचविले पाहिजे या कर्तव्याची जाणीव त्याच्या अंतरीं वास करीत असल्यामुळेंच-त्याच्या तोंडून ते उद्गार बाहेर पडले अन् तो मुलगा बचावला.

असे अनेक प्रसंग मी पाहिलेले आहेत, अनुभवलेले आहेत. आपण रस्त्यांतून चालतांना जर आपल्याला कोठें एखादा अपघात घडणार असें वाटूं लागलें कीं आपल्या मुखांतून तो अपघात टाळण्याकरितां सहजच उद्गार बाहेर पडतात. इतकेंच नव्हे तर एखाद्या वेळीं आपल्या ओरडण्यानें तो अपघात टळणार नाहीं, हें निश्चित माहीत असतांही आपल्याला राहवत नाहीं. हे उद्गार 'काढूं' म्हणून निघत नाहींत तर केवळ अंतरींच्या आपुलकीनें, मानवतेच्या माणुसकीमुळेंच निघत असतात.

नोव्हेंबर १९४३

---

रविवारचा दिवस होता तो. सौ. माहेरी गेली असल्यामुळें गडकऱ्यांच्या भावबंधनांतल्या कामण्णाच्या विरहाच्या यादीप्रमाणें मी विरहाच्या पांचव्या अवस्थेंत होतों. जिवाला कोठेंतरी गुंतवावें म्हणून मी दुपारचा चहा आटोपून बॉम्बे टॉकीजचा गाजलेला 'बन्धन' चित्रपट पहावयास गेलों. मला थिएटरांत पोंचायला थोडासा उशीरच झाला. अन् तोच गाढवपणा मला चित्रपट संपेपर्यंत भोंवला.

चित्रपट सुरू झालेला असल्यामुळें थिएटरमध्यें काळोख होता. तेथें हजर असलेल्या डोअरकीपरनें मला आपल्या बॅटरीच्या प्रकाशांत एक रिकामी खुर्ची दाखविली. मधलीच रिकामी खुर्ची होती ती. नाइलाजानें मला कसलाही विचार न करतां ती रिकामी खुर्चीच भरून काढावी लागली.

स्थानापन्न झाल्यावर पडद्याकडे पाहिलें तों जाहिरातीच सुरू होत्या. मला जरा हायसें वाटलें. पण इतक्यांत माझ्या शेजारी बसलेला एक वीर (तो प्रेमवीर होता हें मला मागाहून समजलें) कोणाला तरी जाहिरातींची माहिती पुरवीत होता. बऱ्याचशा जाहिराती दादर विभागांतीलच असल्यामुळें कदाचित आपुलकीच्या भावनेनें तो माहिती पुरवीत असावा अशी मनाची तात्पुरती समजूत घालून पुढें तरी 'बन्धन' चित्रपट कॉमेंटस् शिवाय पाहायला मिळेल अशा सुखाशेवर मी पडद्याकडे पाहूं लागलों.

थोड्याच वेळांत जाहिराती संपल्या अन् चित्रपट सुरू झाला. आणि माझें दुर्दैव असें कीं माझ्या शेजारची 'टॉकीही' सुरू झाली. चणेकुरमुरे

मला त्या सर्व गुन्हेगारांची दया आली. त्यांना तुरुंगांत डांबून माझ्याकडून त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याच्या झालेल्या घोर अपराधाबद्दल मला पश्चात्ताप झाला.

मन बेचैन झालें. तशा अवस्थेंत माझा केव्हां डोळा लागला तें मला कळलेंही नाहीं.

शेवटीं खडखडाटानें मी एकदम दचकून जागा झालों. पाहतों तों माझी सौ. च मला बंदीवासांतून सोडवीत होती.

२९-१०-४०

## मळकें धोतर. : १२ :

माझ्या मित्रमंडळींनीं किती आग्रह केला मला बाहेर फिरायला येण्या-करितां ! पण कांहीं केल्या मी त्यांच्या आग्रहाला बळी पडलों नाहीं. निरनिराळ्या अनेक सबबी सांगितल्या मी त्यांना, पण त्या लंगड्या आहेत असा एकमतानें ठराव पसार करून त्यांनीं माझा पिच्छा पुरवायला सुरवात केली.

माझें खरें कारण निराळेंच होतें अन् तें जरा चमत्कारिकही होतें. अखेर शेवटीं प्रकृति जरा नादुरुस्त आहे अशी खोटीच सबब पुढें केली. ही सबब मात्र त्यांना मनापासून पटली नसली तरी त्यांनीं ती आपल्याला पटल्याचें कबूल केलें व त्या सर्व स्वाऱ्या माझ्या खोलींतून बाहेर पडल्या. त्यांना बाहेर जातांना पाहून मी एक सुस्कारा सोडला अन् फिरून आरामखुर्चीवर वाचत पडलों.

पण वाचनांत कांहीं केल्या लक्षच लागेना माझें. ज्या कारणामुळें मी प्रेमळ मित्रांचा हिरमोड केला तें कारण एकसारखे माझ्या मनाला टोंचीत होतें. तें कारण तरी काय ? तर माझें मळकें धोतर !

ऑफिसला जाण्याच्या गडबडींत आदल्या दिवशीं त्याला नीट साबू लावून धुण्याचे न जमल्यामुळें व दुसऱ्या दिवशीं सुटीच आहे, घरीं नेसायला चालेल अशा दृष्टीनें मी तें नुसतेंच पिळून टाकलें होतें.

परंतु हें कारण जरी खरें असलें तरी माझ्या मित्रमंडळींना तें सांगण्याबद्दल माझ्या मनाला कसेंसेंच वाटलें. अन् जर मी सांगितलें असतें तर त्यांनीं माझी रेवडी उडवायला कमी केलें नसतें हें मी जाणून होतों.

गेल्या गणेशोत्सवांतील गोष्ट. शनिवारचा दिवस होता तो. दुसऱ्या दिवशींच अनंतचतुर्दशी असल्यामुळें उत्सवांतली कत्तलीचीच रात्र होती ती. उत्सवांतला अत्यंत उत्कृष्ट कार्यक्रम त्या दिवशीं ठेवण्यांत येत असतो. कारण दुसऱ्या दिवशीं सुटीचा दिवस असल्या कारणानें सर्वांना त्या कार्यक्रमाचा आनंद मनमुराद लुटावयास मिळतो.

आमच्या चाळींतही त्या दिवशीं नाटकाचा कार्यक्रम आंखलेला होता. नाटक म्हटलें कीं लोकांचा उत्साह काय विचारावा ! अन् त्यांतल्या त्यांत चाळींतील हौशी मंडळींचेंच नाटक. शिवाय स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच केलेल्या. मग काय उत्साहाला पारावारच नाहीं.

नाटक पाहण्याकरितां आबालवृद्धांची कोण धडपड ! खेळाची वेळ दहाची होती तरी सात आठ वाजल्यापासून मंडपांत एकेकजण आपलें प्रस्थान ठेवावयाला लागला होता.

नेहमींप्रमाणें आमच्या घरची मंडळी—म्हणजे आमची सौ.—नाटकाला जायला निघाली. प्रत्येक कार्यक्रमाला—मग तो कसलाही असो—हजर राहून वर्गणीची पुरेपूर वसुली करायची असा जणूं काय तिनें विडाच उचलल्यासारखा दिसत होता.

अगोदरच मला जागरणाचा कंटाळा. अन् तशांत माझी प्रकृतीही अंमळ बरी नसल्यामुळें नाटकाला जायचं नाहीं असें मी ठरविलें होतें.

आमच्या जागरूकतेची पूर्ण माहिती असल्यामुळेंच—नव्हे एक दोन वेळेला तिची खात्री झाल्यामुळें—कार्यक्रमाहून परत आल्यावर माझ्या

कुंभकर्णी निद्रेचें जाहीर प्रदर्शन होऊं नये म्हणून आमच्या सौ. नें बाहेर कुलूप ठोकून कार्यक्रमास जाण्याचा परिपाठ ठेवलेला होता. त्याप्रमाणें आजही आपल्या बहुमोल अलंकाराला—( हो ! कारण पति हा स्त्रीचा अलंकार असें कुणीसें म्हटलें आहे ना !) खोलींत कोंडून ठेवून ती नाटकाची मजा लुटायला निघून गेली.

ती गेली तेव्हां मी आरामखुर्चीत वाचीत पडलों होतों. पण काय असेल तें असो मला त्या खुर्चीत बसवेना. बाहेरून कुलूप लावण्याचा हा कांहीं नवीनच उपक्रम नव्हता. पण फरक इतकाच कि आतांपर्यंत ज्या ज्या वेळीं ती गेली, त्या त्या वेळीं मी झोंपी गेलेला असल्यामुळें मला आपल्या बंदीवासाची जाणीव झाली नव्हती.

बाहेर दरवाजाला कुलूप होतें अन् मी अक्षरशः कोंडला गेलों होतों. माझ्या बंदीवासाची कल्पना येतांच माझें वाचनाकडे लक्ष लागेना, आरामखुर्चीत बसण्यांत 'राम' वाटेना आणि स्वस्थपणें झोंपही येईना. माझें स्वातंत्र्य मी आपण होऊन गमावल्याबद्दल मला माझाच मनस्वी संताप आला. डोकें सुन्न झालें.

तुरुंगांत डांबून ठेवलेल्या कैद्यांच्या करुण दृश्यांचा चित्रपट माझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागला.

त्यांच्या टीचभर खोल्या, त्यांचीं वस्त्रें, त्यांना करावीं लागणारीं कष्टांचीं कामें, स्वातंत्र्य गमावल्यामुळें व अधिकाऱ्यांच्या छळामुळें म्लान झालेल्या त्यांच्या मुद्रा पाहून माझें हृदय हललें.

आजपर्यंत कोर्टात वकिली करीत असतां कित्येकांना न्यायाधिशानें फर्माविलेल्या शिक्षेमुळें माझें हृदय कधींही द्रवलें नाहीं. उलट त्या खटल्यांच्या हकीकतीचें, गुन्हेगारांचे गुन्हे शाबीत करण्याकरितां लढवलेल्या खऱ्याखोट्या वकिली डावपेचांचें मी चारचौघांत रसभरीत वर्णनच करीत असे. पण आज !

खरें पाहिलें असतां मळक्या धोतराबद्दल मला इतकें वाईट वाटण्याचें काय कारण होतें ? पाटलोण, शर्ट, कोट नाहीं का आपण चारचार दिवस धुतल्याशिवाय वापरीत ? पुजेच्या वेळीं नेसण्याचा पितांबर अगर सोवळें नाहीं का वर्षानुवर्षें धुतल्याशिवाय वापरीत ? मग माझें धोतर जरासें मळकें असल्यामुळें मी प्रेमळ मित्रांच्या सहवासाला आणि काव्यशास्त्र-विनोदाला कां मुकावें ? मनाचा इतका कमकुवतपणा कां दाखवावा ?

याला कारण एकच ! आपल्यामध्यें उत्पन्न झालेली, नव्हे ठाण मारून बसलेली छानछोकीपणाची, झकपक पोषाखी वृत्ति ! पण त्यांत तरी काय चूक आहे ? समाजांत मनुष्याला कपड्यावरूनच त्याच्या बाह्यरूपा-वरूनच मान-सन्मान मिळत असतो ना ? आणि सन्मान, मानमरातब मिळविण्याची हौस कुणाला नाहीं ? मग झकपक पोषाख असावा असें वाटलें तर त्यांत काय बिघडलें ?

बाह्यरूपावरूनच एकदां एका लग्नांत मोठें थोरलें विघ्न उपस्थित झाल्याचें मला माहीत आहे. मुलीचे मामा साधारण म्हातारेसे गृहस्थ होते. लग्नाच्या गडबडींत कांहीं जरी काम निघालें तरी मामांचाच सर्वांत पुढाकार असे. मग तें काम कांहीं आणावयाचें असो कीं पोंचवायचें असो; मोठमोठ्या वाटाघाटी करण्याचें असो कीं पानें मांडण्यापासून पंक्तींत वाढण्याचें असो; मामा आपली कंबर कसून तयार ! परंतु त्यांच्या पोषाखावरून व हरघडी त्यांनाच कामाला लावल्याचें पाहून नवऱ्या मुलाकडील वऱ्हाडी मंडळींना हा गृहस्थ कोणीतरी नोकरवर्गापैकींच असावा असें वाटलें.

दोन्हीं पक्षाकडील मंडळी एकाच मोठ्या वाड्यांत उतरलीं होतीं. एकदां कांहीं कामानिमित्त मामा नवऱ्यामुलाच्या भागांत गेले. त्यांना कांहीं महत्त्वाच्या बाबतींत विचारपूस करायची होती. ते गेले तेव्हां

नवऱ्यामुलाकडील वऱ्हाडी मंडळी गप्पाटप्पा करण्यांत गुंग झाली होती. पांच मिनिटें झालीं, दहा झालीं तरी मामा आपले दरवाजांत उभे. अखेर कांहीं वेळानें एका आजीबाईचें त्या धीरगंभीर मूर्तीकडे लक्ष गेलें व त्यांनीं मंडळींना गप्पांतून सावध केलें. नवऱ्यामुलाकडील एका शिष्टानें तर मामांना 'काय रे, काय पाहिजे आहे?' असा सवाल टाकला.

आधींच चेतलेल्या संतापाग्नींत त्या प्रश्नानें भरच टाकली. मामांनीं पोक्त विचार करून तडक शिस्तींत माघार घेतली आणि आपल्या मंडळींत येऊन तोंडाचा असा पट्टा सुरू केला कीं कांहीं विचारूं नका! अखेर त्यांना घेऊन वधूचे वडील वरपक्षाकडे गेले व मामांची ओळख त्यांनीं जरा कडक शब्दांतच करून दिली. अर्थात् चूक कबूल करण्यांत आली, मामांनींही उदार अंतःकरणानें क्षमा केली व लग्नकार्य सुरळीत पार पडलें.

बाह्यांगावरूनच पारख करण्याची प्रवृत्ति जोंपर्यंत नाहींशी होणार नाहीं तोंपर्यंत माणसाची पोषाखी वृत्ति कमी होणें शक्य आहे काय?

जानेवारी १९४२

---

"अरे, जरा इकडे ये. तुला एक गम्मत दाखवतों" माझा मित्र मला म्हणाला. मी कांहींतरी कामांत असल्यामुळें मला विनाकारण वेळ फुकट घालवावासा वाटेना. पण त्याबरोबरच माझ्या मित्राची विनंतीही अमान्य करवेना.

"कसली गम्मत आहे?" मी समजून घेण्याच्या उद्देशानें त्याला विचारलें.

त्याची नजर अजूनही खिडकीखालीं खिळलेली होती–अन् मधून मधून त्याच्या चेहऱ्यावर हास्यही चमकत होतें. त्याच्याकडे पाहून आपल्याला कांहींतरी विशेष पहायला मिळणार याबद्दल माझी खात्री झाली.

"हें बघ, तुला एक सुंदर स्त्री दाखवतों. चल, ऊठ लवकर." त्यानें माझ्या संशयाचें निराकरण केलें. अन् लगेच मोठ्या उत्सुकतेनें तो खालीं पाहूं लागला.

त्याचें म्हणणें अगदींच खोटें असेल अशी मला मुळींच शंका आली नाहीं. कारण आमच्या समोरील पटांगणांत महिलांचा एक बॅडमिंटनचा क्लब रोज सायंकाळीं खेळत असे हें मला माहीत होतें. त्यामुळें माझ्या मित्रानें मला गम्मत–अन् तीही एक सौंदर्यवती–दाखवितों म्हणतांच मलाही तिला पाहण्याचा मोह आवरला नाहीं. मी जागेवरून उठलों अन् खिडकींतून खालीं डोकावलों. पण बाहेर पाहतांच मला काय दिसलें!

एक अत्यंत कुरूप स्त्री, कृष्णवर्णाची, दतपंक्ती पुढें आलेली, बटबटीत डोळ्यांची, स्थूल देहाची, खुजी अशी स्त्री मला दिसली.

मी माझ्या मित्राकडे पाहिलें. माझें आईस्क्रीम केल्याबद्दल माझा मित्र विजयोन्मादानें माझ्याकडे पाहून हंसत होता. "कां ? कशी केली ?" हेंच जणूं कांहीं मला तो विचारीत होता.

खिडकींतून त्या कुरूप स्त्रीला पाहतांच—लवकर पोंचावें म्हणून टॅक्सी करून निघावें व नाक्यावरच्या पोलिसानें आपली टॅक्सी अडवून ठेवावी, चित्रपट ऐन रंगांत आला असतां एकदम मध्येंच फिल्म तुटावी म्हणजे त्या पोलिसाचा, त्या ऑपरेटरचा जसा मनस्वी संताप येतो, तसाच किंबहुना कांकणभर जास्तच, मला माझ्या मित्राच्या त्या वर्तनाचा राग आला.

माझ्या मित्राला मात्र आपण विनोद करून एका मित्राला फसविलें म्हणून आनंद झाला होता. पण आपला विनोद, आपण केलेली गम्मत कशावर आधारलेली आहे याचा मात्र त्यानें मुळींच विचार केलेला नव्हता.

ती स्त्री कुरूप होती, हा का तिचा दोष ? जगांत सर्वच कुठें सुंदर असतात काय ? परमेश्वरानें जर जगांतील सर्व चराचर वस्तु अत्यंत सुंदर किंवा अत्यंत कुरूप अशाच निर्मिल्या असल्या तर मग सौंदर्य अन् कुरुपता असा प्रश्नच उद्‌भवला नसता. आणि माझ्या मित्रासारख्यांची कुरूप स्त्रियांना पाहून विनोद करण्याची वृत्ति निर्माणच झाली नसती. उलट कुरुपता दृष्टोत्पत्तीस येते म्हणूनच सौंदर्याला मान मिळत असतो असें म्हटल्यास मुळींच वावगें होणार नाहीं. पण हा विचार कुणीच मनांत आणीत नसतो.

मनुष्य सौंदर्याची भक्ति करील परंतु कुरुपतेबद्दल फुकटची सहानुभूति दाखवणार नाहीं. मी म्हणतों सहानुभूति दाखवावी असें वाटत नसेल तर नका दाखवूं सहानुभूति; पण त्याबरोबरच कुरुपतेची होळी

करून त्यावर आपल्या समाधानाची पोळी तरी भाजून घेऊं नका. पण तें होणेंच शक्य नाही, असा आपला अनुभवच आपल्याला सांगत नाहीं काय ?

नकलांचा कार्यक्रम पहात असतां रँगलर परांजपे, कै. बाळ गंगाधर टिळक, श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या नकलांपेक्षां एखाद्या आंधळ्या-पांगळ्या भिकाऱ्याची अगर अवस मागणाऱ्या भिकारणीची नक्कल पाहूनच प्रेक्षकवर्ग समाधान मानतांना दिसून येतो.

चित्रपटाचें उदाहरण द्यावयाचें झाल्यास लोकप्रिय नट श्री. दामुअण्णा मालवणकर यांचें देता येईल. दामुअण्णा मालवणकरांचें काम पहात असतां प्रेक्षकवर्गांत हास्याचीं कारंजीं उडतात याचें तरी कारण काय ? त्यांचा चकणा डोळा ! हेंच त्या प्रश्नाचें उत्तर. आज त्यांनीं हजारावर पगार मिळविला आहे, नांवलौकिक कमावला आहे, सिनेमाप्रेमी लोकांचीं अंतःकरणें काबीज केलीं आहेत. परंतु त्यांच्या खाजगी आयुष्यांत त्यांना आपल्या चकण्या डोळ्याचें—या कुरुपतेचें—शल्य खात्रीनें बोंचत असेलच असेल. आणि तें स्वाभाविक आहे.

सांगायचें तात्पर्य काय, कीं जगांतील कुरुपता पाहून त्यावर समाधान मानून घेण्याची प्रवृत्ति मनुष्यप्राण्यांत हरघडी दिसून येते. मी तरी याला अपवाद कोठें आहे म्हणा ! मीसुद्धां जे हे दोन शब्द खरडले आणि लिहिणें संपल्यावर आपण कांहींतरी लिहूं शकलों याबद्दल समाधान वाटलें याचें तरी कारण काय ? मला ती कुरूप स्त्री दिसली म्हणूनच ना ? तीच जर मला माझ्या मित्रानें खरोखरच एखादी सौंदर्यवती दाखवली असती तर मी हें लिहिण्याच्या भानगडींत न पडतां तिच्या सौंदर्याकडेच पाहात राहिलों नसतों का ?

प्रसिद्ध—भगिनी फेब्रुवारी १९४४

## मुलगा आणि पराणी : १४ :

शहरच्या यांत्रिक आयुष्याचा थोडा विसर पडून खेडेगांवांतील निसर्गरम्य वातावरणांतील आयुष्याचा रसास्वाद घ्यावयास मिळावा म्हणून तीन चार दिवसांची रजा काढून मी आपल्या रम्य खेडेगांवीं गेलों होतों.

या खेपेस ब्ऱ्याच दिवसांनीं आस्मादिकांची स्वारी गेल्यामुळें गांवांतील मित्रमंडळी माझ्या भेटीकरितां अत्यंत उत्सुक झाली होती.

प्रेमळ आप्तेष्टांचा आणि मनमिळाऊ मित्रांचा पाहुणचार घेतां घेतां सुटी कशी संपली तें लक्षांतही आलें नाहीं. रात्र थोडी अन् सोंगें फार अशीच अवस्था झाली होती माझी.

तशा घिसाडघाईंत जरी मी थोडा थोडा वेळ का होईना सर्वांच्या गांठीभेटी घेतल्या तरी चुकून एका जिवलग मित्राकडे जाऊन यायचें राहिलेंच. अखेर दुपारीं गांव सोडायचें ठरलेलें असल्यामुळें मी सकाळींच त्याच्याकडे जावयास निघालों.

खेडेगांवांतील हमरस्ता अन् शहरांतील लहानशी गल्ली सारखीच. सर्व वाहतुक या हमरस्त्यानेंच व्हायची. गांवांतल्या राजमार्गानें मी जात असतां समोरूनच बैलगाड्यांची एक रांगच्या रांग येत होती.

सकाळचीच वेळ असल्यामुळें जिकडे तिकडे शांतता होती. आणि त्यामुळेंच बैलांच्या गळ्यांतील घंटांचा निनाद ऐकूं येऊन मनाला मोठी मौज वाटत होती. किती तालबद्ध होते तें संगीत! शहरांतील व्यवसाय सोडून खेड्यांत यावें अन् गाडी जुंपून त्या संगीताचा मनमुराद आनंद

लुटावा असाही विचार क्षणभर मनांत चमकून गेला. कोणतीही नवीन गोष्ट पाहिली कीं तिचा मनाला हव्यास वाटावा हें कांही नवीन नाहीं.

त्याच रांकेंत सर्वांच्या शेवटीं असलेल्या बैलगाडीवर एक सहा सात वर्षांचा चिमणा बालवीर हातांत पराणी घेऊन गाडी हांकीत होता. बैल जरी शिस्तींत चालले होते तरी पण हा मुलगा आपल्या हातांतील पराणी बैलांच्या पाठींत आळीपाळीनें खुपसत होता.

त्या मुलाचें हें निर्दय कृत्य पाहून माझ्यापुढेंच चालणाऱ्या एका मनुष्यानें त्या मुलाची बरीच कानउघाडणी केली. त्याचा परिणामही त्या मुलावर झालाच. पण तो किती वेळ? क्षणभरच. गाडी पुढें सटकल्यावर मुलाचा पराणी खुपसण्याचा कार्यक्रम मला दिसलाच.

त्या मुलाचें हें कृत्य कोणीही समंजस माणूस चांगलें म्हणणार नाहीं. परंतु हा दोष सर्वस्वी त्या मुलाच्या माथीं मारतां येणार नाहीं. लहानपणापासूनच मोठेपणाची सत्ता गाजविण्याची हांव मनुष्यप्राण्यांत असलेली आपल्या दृष्टोत्पत्तीस येते.

बालवयांत बाल–बालिका एकत्र जमून ‘ शाळा–शाळा ’ खेळत असल्याचें आपण पाहतों. परंतु त्या खेळांत विद्यार्थी होण्यापेक्षां ‘मास्तर’ होण्याकरितांच त्यांच्यांत अहमहमिका लागल्याचें दिसून येतें. अन् ‘ मास्तर ’ तरी कां व्हायचें ? मुलांना शिकविण्याकरितां ? मुळींच नाहीं. तर विद्यार्थ्यांना मनसोक्त मारण्याकरितां ! ‘ मास्तर ’ बनलेला लहान मुलगा हातांत छडी घेऊन त्यांना शिकवण्यापेक्षां शिस्तींत बसविण्यांत व वेळप्रसंगीं एखाद्याला छडीचा ‘ प्रसाद ’ देण्यांतच गुंग झालेला दिसतो.

एखाद्या हपिसांत साध्या कारकुनाच्या जागेवर असलेल्या मनुष्याचे डोळे ‘ हेडक्लार्केशिप् ’ कधीं मिळते याच्याकडे लागलेले असतात. निव्वळ जादा पैसा मिळविण्याकरतांच तो अधिर झालेला नसतो; तर पैशाबरोबरच

सत्तेची त्याला जास्त आकांक्षा असते. तसें नसतें तर खालच्या हुद्यावरचा मनुष्य वरच्या हुद्यावर चढतांक्षणींच, हाताखालच्या लोकांशीं एकवेळच्या त्याच्या सहाध्यायांशीं नेहमींप्रमाणेंच खेळीमेळीनें, प्रेमानें वागला असता. परंतु अशीं उदाहरणें शेंकडा पांचही सांपडत नाहींत. उलट वड्या हुद्यावर आरूढ झाल्यानंतर हाताखालच्या लोकांना छळणारेच जास्त आढळून येतात.

जगांतील कोणत्याही क्षेत्रांत नजर टाका, मनुष्य प्राण्यांत दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याची स्पर्धा मिळविण्याकरितां चढाओढ लागलेली दिसेल.

क्रिकेटच्या क्षेत्रांत कॅप्टनशीपकरितां मारामार; तर नाट्यक्षेत्रांत नायकाची अगर नायिकेची भूमिका मिळविण्याकरितां भांडाभांड. आणि त्याचें पर्यवसान कधीं कधीं तो क्रिकेटक्लब अगर तें नाट्यमंडळ मोडण्यांत होत असतें.

या सर्व गोष्टींवरून हेंच प्रत्ययास येतें कीं, प्रत्येकाला, मग तो लहान असो कीं मोठा असो, राव असो कीं रंक असो, 'मोठेपणा मिळवून आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यांतच जीवनाचें अंतीम वाटतें.

सहासात वर्षांचा चिमणा बालक तो ! त्या वयांत त्यानें आपलें जीवन नाचण्याबागडण्यांत घालवावयाचें, तें सोडून मोठ्या माणसाची जबाबदारी त्यानें कां पत्करली ? तर त्याच्यांतील सत्तेच्या-वर्चस्वाच्या मनोवृत्तीमुळेंच नाहीं काय ?

मित्राकडे गेल्यानंतर त्याच्याशीं मनमोकळेपणानें गप्पा झोडल्या, राजकारणावर, लढाईवर चर्चा केली, चहापान केलें, परंतु पुन्हां घरच्या रस्त्याला लागतांच बैलांना विनाकारण पराणी खुपसणाऱ्या त्या चिमण्या मुलाची ती मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर सारखी दिसत होती.

५-४-१९४२

## आधीं गोड–मग कडू !  : १५ :

सायंकाळची वेळ होती ती. ऑफिसमधील कारकून, गिरण्यांतील कामगार आपलीं नित्याचीं कामें आटपून घरीं जाण्याच्या गडबडींत आपली वाट चालत होते. मीही त्यावेळी दादर रेल्वे स्टेशनवरील पुलावरून चाललों होतों.

नुकतीच एक 'लोकल' येऊन गेल्यामुळें आधींच्या जनसागराशीं लोकलनें आलेल्या उतारूंच्या प्रवाह एकरूप होत होता. पुलावर गर्दी तर मी म्हणत होती! प्रत्येकालाच लवकर जाण्याची घाई असल्यामुळें जो तो गर्दीतून पुढें सटकण्याची शिकस्त करीत होता. परंतु त्यांत यश मात्र फारच अल्प प्रमाणांत येत होतें.

पुलावरील त्यावेळचा देखावा एखाद्या मिरवणुकीसारखा भासत होता. त्यांतूनच 'छे छे आना, लीलामका माल छे छे आना; आण्याला चार चिकू, थोडे राहिले, आण्याला चार; दो आना रुमाल; कोइबी चीज उठाव, एकेक आना, कंपनी सरकारका दिवाला; पैशाला दोन लिंबें, पैशाला दोन;' वगैरे फेरीवाल्यांच्या कर्णकठोर परंतु तितक्याच आकर्षक अशा ललकाऱ्या ऐकूं येत होत्या. फेरीवाल्यांना साथ करायलाच कीं काय कांहीं आंधळेपांगळे भिकारी, फकीरही 'आंधळ्याला पैसा दे बाबा, गरिबावर दया करो शेट, जो देगा उसकाभी भला, न देगा उसकाभी भला,' असें म्हणत मधून मधून दिसत होते. तर पुलाच्या पायथ्याशीं, 'गाईला चारा घाला, सोमवार आहे पुण्य लागेल' असें सांगणारे कांहीं 'गोपाळ'ही उभे ठाकलेले होते.

पुलावरून येणारीं जाणारीं माणसेंही कांहीं गप्प नव्हतीं. त्यांतील कांहीं ऑफीसमधील काम वाढल्याचें रडगाणें गात होतीं, तर कांहीं लढाईच्या भवितव्याची जोरदार चर्चा करीत होतीं. कांहीं पक्षाभिमानी आपापल्या पक्षाचें धोरण कसें बरोबर आहे हें सोदाहरणानें पटवून देण्याची कोशीस करीत होतीं. अशा प्रकारच्या निरनिराळ्या देखाव्यांनीं तो पूल अगदीं गजबजून गेला होता.

त्या भाऊगर्दीतूनच दोन इसम मोठ्या तावातावानें कसलीशी चर्चा करीत चालले होते. त्यापैकीं एकजण दुसऱ्याला बजावीत होता—' हें पहा, आधीं कडू, मग गोड असं आहे—' पुढचे शब्द तो पुढें सटकून गेल्यामुळें मला ऐकूं आले नाहींत.

परंतु जे शब्द मी ऐकले त्यावरूनच माझी विचारमालिका सुरू झाली. तो गृहस्थ मोठ्या तोऱ्यांत बोलून तर गेला. परंतु त्याचे ते बोल खरे होते का? अंतःकरणापासून त्याला तसें वाटत असेल काय? ज्या व्यवहारी जगांत त्यानें आपल्या वयाचीं बरींच वर्षें खर्चीं घातलीं होतीं त्या जगाचा अनुभव घेतल्यानंतरही त्याला त्या बोलाची सत्यता पटली असेल तर जगाकडे पाहाण्याच्या त्याच्या चष्म्याचीं भिंगें (Lenses) असामान्य असलीं पाहिजेत हें कांहीं सांगावयास नकोच.

जगांतील मानवांचें जर आपण बारकाईनें निरीक्षण करूं लागलों तर आपल्याला, ' आधीं गोड, मग कडू ' अशीच त्यांची वागण्याची पद्धत दिसून येईल.

लहानपणीं मुलामुलींचे आपण वाटेल तसे लाड पुरवतों, कौतुक करतों, त्यांच्याशीं अत्यंत गोडीगुलाबीनें वागतों. पण तींच मोठीं झालीं, वयांत आलीं, स्वैरवर्तन करूं लागलीं कीं ताबडतोब आपल्याला कडू बोलांचा उपयोग करून त्यांना ताळ्यावर आणावें लागतें.

एखादी कजाग सासूदेखील सून नवीनच आली कीं तिला तळहातावरील फोडाप्रमाणें जपते. पण कांहीं दिवस जातांच, प्रेमाचा भर ओसरतांच तिचा मनस्वी छळ करण्यासहीं मागें पुढें पाहात नाहीं.

शाळेंत नवीनच आलेला एखादा शिक्षक आपल्या छात्रगणाशीं, सहकाऱ्यांशीं, अधिकाऱ्यांशीं इतक्या प्रेमळपणें वागतो कीं थोड्याच काळांत तो सर्वांना आपलेसें करून टाकतो. पण त्याचें बस्तान बसतांच मग हळुहळू तो आपलें खरें स्वरूप प्रगट करूं लागतो आणि त्याचा परिणाम शेवटीं सर्वांशीं कडू होण्यांत होतो.

नूतन दांपत्याच्या बाबतींतहि आपल्याला असेच प्रकार पाहावयाला मिळत नाहींत काय ? मग तें दांपत्य प्रेमरज्जूंनीं बद्ध झालेलें असो कीं वडील मंडळींच्या आज्ञेनुसार विवाहग्रंथीनें निगडींत झालेलें असो.

त्याचप्रमाणें निरनिराळ्या पक्षाचे पुढारी, संस्थांचे चालक, नाटक सिनेमा कंपन्यांचे मालक, लेखक, प्रकाशक वगैरे सर्व माणसें आपली छाप इतरांवर बसण्यापूर्वी गोडच असतात. नव्हे तीं तशीं वागतात. पण त्यांच्या क्षेत्रांत आपल्या पायांना भरपूर आधार मिळतांच, आपल्या पायांवर आपल्याला आतां उभें राहतां येईल अशी खात्री होतांच मग ते इतरांशीं कडू वागूं लागतात याचें तरी काय कारण ? कारण एकच. हीच जगांतील लोकमान्य आचरण पद्धती !

थंडीतापावर आपण जें क्किनाइन घेतों तेंसुद्धां आपल्याला कडू असणारें आवडत नाहीं. आपल्याला तें घेववत नाहीं. त्याकरितां आपण तें शर्करावगुंठित स्वरुपांत असलेलें पसंत करतों.

तात्पर्य काय, कीं 'आधीं कडू, मग गोड' हें जरी ऐकायला चांगलें असलें तरी कृतींत 'आधीं गोड, मग कडू' हेंच दृष्टोत्पत्तीस येतें हें निश्चित !

प्रसिद्धी-भालचंद्र डिसेंबर १९४३

'हिंदवासियांनो, तुमची एकी होऊं द्या कीं आम्ही तुम्हांला 'स्वराज्य' द्यायला एका पायावर तयार आहोंत' अशा तऱ्हेचें आश्वासन आज कैक वर्षे आपल्याला ब्रिटिश सरकार देत आलें आहे. हिंदुस्थानांतील लोकांत स्वराज्यप्राप्तीनंतर तंटेबखेडे होऊं नयेत, त्यांचा कारभार अगदीं गुण्या-गोविंदानें चालावा अशीच त्यांची सदिच्छा (!) असावी असें वरवर विचार केल्यास दिसून येईल. पण तें पक्कें जाणून आहेत कीं जोंपर्यंत हिंदुस्थानांत जे निरनिराळे पक्ष आहेत तोंपर्यंत त्यांच्यांत एकी होणें शक्य नाहीं. याचें एक साधेंच उदाहरण मला परवां अनुभवावयास मिळालें.

श्रावणांतल्या 'मंगळागौरीची रात्र' होती ती. आमच्या अगदीं समो-रच्याच बिऱ्हाडांत एक मंगळागौर साजरी करण्यांत आली होती. स्त्रियांची मंगळागौर म्हणजे पुरुषांच्या झोंपेचें खोबरेंच! पण पुरुषही कांहीं कमी नव्हते. स्त्रियांच्या विविध कार्यक्रमाच्या धागडधिंग्यांत एवी तेवी झोंपेला मुकावें लागणारच तर त्यापेक्षां आपणही आपला एक कार्यक्रम ठेवावा. असा पोक्त विचार करून त्यांनीं एका गवई मित्राचें गाणें ठरविलें. त्यांचा तो बेत मला फारच आवडला व यजमानांच्या दूरदर्शीपणाचें कौतुकही वाटलें. त्याचबरोबर एका उत्कृष्ट गवयाचें गाणें ऐकावयास मिळणार म्हणून आनंदही झाला. पण—

माझ्या आनंदावर रात्रौ विरजण पडलें. त्याच दिवशीं आमच्या शेजा-रच्या बिल्डिंगमध्यें तळमजल्यावर दोन श्रीसत्यनारायणाच्या पूजा होत्या.

एक होती एका व्यापाऱ्याकडे आणि दुसरी होती त्याच्याच शेजारी असलेल्या एका बिऱ्हाडकरूकडे. बिऱ्हाडकरूनें करमणुकीकरितां चौघडा आणला होता. व सायंकाळपासून चौघडा आपलें अस्तित्व गाजवीतही होता. सनई चौघड्याचें मंजूळ संगीत खरोखरच अप्रतिम होतें. सनईवर लोकांच्या आवडीची सिनेमांतील पदें बसविलीं असल्यामुळें व वाजवणाऱ्याचें वादनकौशल्यही अप्रतिम असल्यामुळें आजुबाजूच्या इमारतींतील बरेचसे रहिवाशी अगदीं तन्मयतेनें डोलत होते.

परंतु हवाई हल्ल्याचा इषारा होतांच मनुष्य जसा दचकतो तसेच आम्ही सर्वजण एकदम दचकलों. शेजारच्या व्यापाऱ्यानें आपल्या खास निमंत्रित पाहुण्याकरितां ग्रामोफोनवर रेकॉर्ड सुरू केली. त्यानें लावलेली पहिलीच रेकॉर्ड इतकी धांगडधिंग्याची, कर्कश आवाजाची होती कीं त्याचा परिणाम काय झाला हें पुन्हां सांगण्याची आवश्यकता नाहीं. 'शितावरून भाताची परीक्षा' होतेच ना ? त्याप्रमाणेंच त्याच्या रेकॉर्डस्‌ची आम्हांला पुरेपूर कल्पना आली. आणि नाइलाजानें, मोठ्या कष्टी अंतःकरणानें आम्हांला आपल्याला घरांत प्रवेश करावाच लागला. कारण या धांगडधिंग्यांत सनईचें कर्णमधुर संगीत केव्हांच लुप्त झालें.

कांहीं वेळानें चौघडा बंद झाला. परंतु काय चमत्कार ! त्या व्यापाऱ्याच्या रेकॉर्डबद्दलची आमची कल्पना अगदीं फोल ठरली. नंतर त्यानें लावलेल्या रेकॉर्डस् फारच सुंदर होत्या. पुन्हां सर्वजण पूर्वीप्रमाणें गाणीं ऐकण्याकरितां घराबाहेर पडले. सनईचौघड्याची उचलबांगडी करण्याकरतांच तर त्यानें मुद्दामच ती रेकॉर्ड लावली नसेल ना ? अशी पुसट शंकाही मनांत येऊन गेली. 'कावळा बसायला अन् फांदी तुटायला' कांहीं वेळा एकच गांठ पडते ना ? तसेंच झालें हें ! पांच सहा उत्तम रेकॉर्डस् ऐकून झाल्यानंतर पुन्हां एकदां हवाई हल्ल्याचा इषारा झाला !

आमच्याच इमारतींतील तळमजल्यावरच्या मारवाड्यानें आपल्या ग्रामोफोनवर ' मारवाडी ' रेकॉर्डस् लावायला सुरवात केली. त्याचा हा रोजचाच ठराविक कार्यक्रम होता. दोन फोनोग्राफमध्यें दोन इमारतीमध्यें जी एक भिंत असते तेवढेंच अंतर होतें. भिंतीच्या एका बाजूला 'मराठी' संगीत व दुसऱ्या बाजूला 'मारवाडी' संगीत ! दोघांचेही आवाज एकमेकांत मिसळून एक नवीनच संगीत निर्माण झालें होतें. ऱ्यापाऱ्याकडे जमलेली पाहुणेमंडळी मात्र शिष्टाचाराला अनुसरून माना डोलवीत होती. दोघेही शेजारी आपल्या जवळील त्याच त्याच रेकॉर्डस् मोठ्या अहमहमिकेनें वाजवीत होते.

होतां होतां दहा वाजले. शेजारी, गाण्याकरितां बोलावलेली मंडळी वेळेवर हजर झाली. गवई मित्रही हजर होताच. पण त्या दोन फोनोग्राफच्या झगड्यांत आपला सूर मिसळण्यास तो जरा नाखुषच दिसला. परंतु एवढ्या रसिकांचा विरस करण्याचे त्याच्या जरा जिवावर आलें. सुमारें अर्धाएक तास वाट वाहून जेव्हां हें मराठी–मारवाडी द्वंद्व थांबणें अशक्य अशी खात्री झाली तेव्हां एकदाची गाण्याला सुरवात करावीच लागली. गाणें दोन अडीच तास झालें. परंतु एरवीं लाभणारा अनुपम आनंद मात्र कुणालाही लुटायला मिळाला नाहीं.

शेजाऱ्या शेजाऱ्यांची, एकाच धर्मांतील लोकांची करमणुकीसारख्या क्षुल्लक गोष्टींत जेथें मिळते घ्यायची तयारी नाहीं, तेथें कांहींतरी तत्त्वें उराशीं बाळगून तीं कृतींत उतरविण्याकरितां निरनिराळ्या पक्षांतील लोक आपापसांत झगडूं लागले तर त्यांत नवल काय !

परंतु प्रत्येकानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं व्यक्ति व्यक्ति मिळूनच समाज तयार होतो. व्यक्तींकडून होणाऱ्या बऱ्यावाईट कृतींचा परिणाम समाजावर होत असतो. याकरितां प्रत्येकानें आपल्या वैयक्तिक सुखाकडे

लक्ष पुरविण्यापेक्षां आपला समाज कसा सुखी होईल याकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या समाजांनीं ज्या योगें आपलें राष्ट्र सुखी होईल, त्याची भरभराट होईल, जगांमध्यें त्याला मानसन्मान मिळेल अशाच गोष्टी केल्या पाहिजेत. आणि जर अशा प्रकारें कार्यें झालीं तर मग आपलीं इतक्या वर्षांचीं सुखस्वप्नें सत्यसृष्टींत यायला कितीसा वेळ लागेल !

सनई चौघडा चालू असतां दुसऱ्या मंडळीबरोबरच आपल्याही पाहुण्यांची करमणूक होत असतांना त्या व्यापाऱ्यानें आपला ग्रामोफोन लावण्याचा विचार मागें टाकण्यास काय हरकत होती ? त्याप्रमाणें त्या मारवाड्यानेंही आपल्या घरांतील तीनचार मंडळींच्या करमणुकीकरितां आपल्या मारवाडी रेकॉर्डस् लावून इतरांच्या करमणुकीचा रसभंग करून काय साधलें !

परंतु यांत साधण्यापेक्षांही आपल्या अविचारी कृतीचे परिणाम काय होतात याकडे कोणी लक्ष देईल तर तें कळणार ! प्रत्येकजण मी करतों तें बरोबरच आहे आणि तें बरोबर आहे म्हणून मी तें करणारच; मग इतरांना तें पटो वा न पटो, त्याचे परिणाम इतरांना भोगावे लागोत वा न लागोत, मी त्याचा माझ्या मनाशीं मुळींच विचार करणार नाहीं; अशीच जेथें प्रत्येकाची मनोभूमिका असते तेथें निरनिराळे पक्ष जरी एखाद्यानें एकत्र आणण्याचा प्रयत्न केला तरी त्या पक्षांचे एकमत होईल व कांहीं तरी निर्णय ठरेल ही आशा करणें व्यर्थच नाहीं का !

१४–९–१९४२

## उजवी शेगडी : १७ :

सायंकाळीं मी खुर्चींत बसून वाचीत असतां कोणीतरी दार ठोठावलें. यावेळीं माझ्याकडे कुणी येण्यासारखें नसल्यामुळें दार ठोठावल्याचा आवाज ऐकून मी आश्चर्यचकित झालों. परंतु दार उघडतांच मला जास्तच आश्चर्य वाटलें. पाहातों तों दारांत एक शेगडीविक्या उभा !

‘ ही घ्या तुमची शेगडी. ” त्यानें मला सांगितलें. माझें आश्चर्य सारखें वाढतच होतें. तो तर आमच्या सौ. नेंच शेगडीची ऑर्डर मुद्दाम दिलेली होती असें ठांसून सांगत होता. माझ्यापुढें पेंचप्रसंग निर्माण झाला. शिवाय सौ. दोन दिवसाकरितां माहेरीं गेली असल्यामुळें व तिनें कांहीं सांगून न ठेवल्यामुळें या आकस्मिक प्रकारानें मी तर गोंधळून गेलों.

“ आत्तांच तर ( म्हणजे सहा महिन्यापूर्वी ) आम्हीं शेगडी घेतली. अन् आज सौ. शेगडीची ऑर्डर कशी देईल ? माझ्या संसारी मनांत विचार चमकून गेला. शेवटीं त्याच्या सांगण्यावरून शेजारीं चौकशी केली. त्यांनींही कालच शेगडी घेतली होती व सौ. नेंच त्याला शेगडीची ऑर्डर दिल्याचें त्यांच्याकडून समजलें.

त्याला शेगडी घरांत ठेवावयास सांगून किंमतीची पृच्छा केली. “ सहा आणे; कालच ठरलेले आहेत. त्यांच्याजवळून सहाच आणे घेतले तर तुमच्याजवळून काय जास्त घ्यायचे ? ” त्यानें उत्तर सुनावलें.

“ सहा आणे ? गेल्यावेळीं तर आम्ही पांच आण्याला घेतली होती ! ” माझें संसारी मन घासाघीस करूं लागलें.

“ नाय शेट ! तुमच्याकरितां मुद्दाम बनवून आणली आहे ! ” तो आपली बाजू मांडू लागला.

" म्हणून मला बनवतो आहेस वाटतं आतां ? " मी विनोद केला.

त्यालाही विनोद समजला. तो हंसला आणि आपली बाजू सांवरू लागला. " तसं नव्हं शेट, तुमच्यासारख्या शिकलेल्या लोकांना आमी काय बनवणार ? "

त्याच्या बोलण्यानें माझ्या अंगावर मूठभर यांस चढलें असें त्याला वाटलें. परंतु जगांत शिकलेल्या लोकांनाच हे असा किरकोळ धंदा करणारे व्यापारीच जास्त बनवीत असतात हें मी जाणून होतों. वर्गांत उत्तम गणित शिकवणारा गणिताचा मास्तर बाजारांत खरेदी करीत असतां व्यापाऱ्याकडून एखाद वेळ बनविला जातोच कीं नाहीं ?

मला विचार करतांना पाहून तोही जरा विचारांत पडला. पण त्यानें मला चौकशी करण्यास सांगितलें. शेगडीची किंमत सहा आणेच होती हें मला मघाशींच चौकशींत समजलें होतें. परंतु त्याला सहा आणे देण्याचें मात्र माझ्या जिवावर आलें. मी देतां देतां सहज म्हणालोंही, " सहा आणे फार होतात या शेगडीला. कांहीं तरी कमी करायला पाहिजेस. " परंतु त्यानें मला, " शेट, तुमी वापरून तर बघा. त्यांच्या शेगडीपेक्षां तुमची शेगडी जरा उजवीच आहे. नांव काढाल नांव ! " असें उत्तर देऊन गप्प बसविलें आणि पैसे हातांत पडतांच तो निघून गेलाही.

मला मात्र त्याच्या उत्तराचें कौतुक वाटलें. ' तुमची शेगडी त्यांच्या-पेक्षां उजवीच आहे ' असें म्हणून त्यानें आपलें व्यापारी कसब चांगलेंच दाखविलें. पण मला वाटतें कीं, प्रत्येक मनुष्यप्राणि थोडा फार व्यापारी वृत्तीचा असतोच असतो. मग तें तीनचार वर्षांचें बालक असो कीं साठसत्तर वर्षांचा वृद्ध असो. राव असो कीं रंक असो. आपल्या आवडत्या प्राण्याची तरफदारी करून त्याचें श्रेष्ठत्व इतरांपेक्षां जास्त आहे, हें तो दुसऱ्याला मोठ्या अहमहमिकेनें पटवून देईल.

चारपांच वर्षांची गरिबाची मुलगी आपली लाकडी बाहुली श्रीमंत मैत्रिणीच्या कचकड्याच्या किंवा रबराच्या सुंदर बाहुलीपेक्षां अधिक चांगली आहे असेंच म्हणेल. एखादा मुलगा उत्तम क्रिकेट खेळणाऱ्या आपल्या मित्राची बरोबरी मेजर नायडूशीं करतांना मुळींच मागेंपुढें पाहणार नाहीं. प्रथितयश नाटककार आपलें नवीन नाटक कंपनीच्या गळ्यांत मारतांना 'मागील नाटकापेक्षां हें तुम्हांला जास्त चांगला हात देईल' असें छातीवर हात ठेवून सांगतांना आढळेल, तर प्रख्यात कादंबरीकार आपली पंधरा वर्षांपूर्वी लिहिलेली गचाळ कादंबरी प्रकाशकाच्या माथीं मारतांना, 'ही कादंबरी समाजांत जोरदार खळबळ उडवून देणार यांत शंका नाहीं.' असें शपथेवर सांगतांना किंचित्‌ही कचरणार नाहीं. काळ्या नटीवर प्रेम करणारा एखादा सिनेमाशोकीन तिच्या काळेपणावर रेखीव अवयवाचें पांघरूण घालील, तर दुसरा एखादा नाट्यप्रेमी आपल्या आवडत्या नटानें रंगभूमीवर गद्यभाग कितीही शामळूपणानें म्हटला तरी त्याच्या संगीतावर तो फिदा होईल व इतरांजवळ त्याचें मनसोक्त कौतुकही करील. परंतु असें करतांना रंगभूमीवर दोन्ही गोष्टींनाही तितकेंच–किंबहुना गद्य भागाला जास्त महत्त्व आहे हें तो विसरतो याचें तरी कारण काय? ही मानवांतील व्यापारी मनोवृत्ति.

हल्लीं सुरू असलेला महायुद्धांत युद्धमान राष्ट्रें स्वतःचें स्वातंत्र्य कायम टिकविण्यासाठीं दुसऱ्या राष्ट्रांवर स्वारी करून त्यांना पारतंत्र्याच्या खाईत लोटतात आणि वर आपल्या कृतीचें समर्थन करतात, यांत तरी त्यांची व्यापारी मनोवृत्तीच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं काय!

मग त्या बिचाऱ्या शेगडीविक्यानें 'तुमची शेगडी त्यांच्यापेक्षां जरा उजवीच आहे' असें सांगून माझ्याकडून सहा आणे वसूल केल्याबद्दल त्याला दोष देण्यापेक्षां मी त्याचें कौतुकच करीन.

प्रसिद्धी–सत्यकथा ऑगस्ट १९४३

# सिंधुलहरी

कथा-संग्रह

# रंगभूमीवर गाजलेलें, साहित्यिकांनीं गौरविलेलें वृत्तपत्रांनीं वाखाणलेलें वाङ्मय

पांडुरंग अनंत वेलणकरकृत

## —पुरुषपात्रविरहित नाटिका—

| | | |
|---|---|---|
| १ सं. मायेच्या मुली [ सम्मेलनांत पहिलें बक्षीस ] | | किं. १२ आणे |
| २ सं. सावत्र-संसार | आवृत्ति २ री | किं. ८ आणे |
| ३ सं. साक्षरता | आवृत्ति २ री | किं. ५ आणे |
| ४ सं. अध्यापिका | आवृत्ति २ री | छापत आहे. |
| ५ सं. कन्याविहार | आवृत्ति २ री | छापत आहे. |

## —स्त्रीपात्रविरहित नाटिका—

| | | |
|---|---|---|
| ६ सं. पाठीराखा | आवृत्ति २ री | किं. १२ आणे |
| ८ सं. चैनीची चट | आवृत्ति ४ थी | किं. ५ आणे |
| ७ सं. मुठीचा मार | आवृत्ति २ री | किं ५ आणे |
| ९ नारसिंहावतार | आवृत्ति १ ली | किं. २॥ आणे |

## —स्त्री-पुरुषपात्रसहित—

| | | |
|---|---|---|
| १० चोरावर मोर | [ विनोदी ] | किं. ५ आणे |
| ११ करमणूक | ,, | किं. ७ आणे |
| १२ दोन संवाद | ,, | किं. ५ आणे |
| १३ सं. 'घ' चा 'मा' | ( नाटक ) | किं. १॥ रु. |
| १४ धाडसी राजकन्या नि इतर गोष्टी | (सचित्र) ढवळे प्रकाशन | किं. ६ आणे |
| १५ जादूचे रुपये | ( सचित्र गोष्ट ) वीणा प्रकाशन | किं. ८ आणे |
| १६ सिंधुलहरी (निबंध व कथा-संग्रह) | वेलणकर प्रकाशन | किं. १॥। रु. |

—पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

**पां. अ. वेलणकर,** २७, युसुफ बिल्डिंग, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४

## साम्यवाद : १ :

गणिताचा तास नुकताच सुरू झाला होता.

शिक्षक खुर्चीवर बसले होते.

मुलांच्या पेन्सिली व वह्या सज्ज झाल्या होत्या उदाहरणें सोडवायला.

कांहीं हुशार मुलें शिक्षकांची आज्ञा ऐकण्यासाठीं आतुर झालीं होतीं.

कांहीं चुकार मुलें उगाचच आपल्या पेन्सिली वह्यांवर फिरवींत होतीं.

जणूं कांहीं आपण हुशार आहोंत असेंच भासवावयाचें होतें त्यांना.

शिक्षक उठले.

मुलेंही सरसावून बसलीं.

अभ्यास न केलेलीं मुलें चुळबुळूं लागलीं.

शिक्षकांनीं प्रश्न केला–“ काल दिलेलीं उदाहरणें सोडवलींत ! ”

हुशार व नियमित अभ्यास करणाऱ्या मुलांनीं “ हो सर ” म्हणून गर्जना केली.

बाकीच्यांनीं त्यांतच आपला सूर मिसळला.

शिक्षक क्षणभर गप्पच होते.

मुलांनीं निःश्वास सोडला.

शिक्षकांनीं वह्या पाहायला सुरवात केली.

ते पहिल्या मुलाजवळ गेले.

तो उभा राहिला.

शिक्षकांनीं त्याची वही हातांत घेतली.

उदाहरणें नव्हतींच सोडवलेलीं त्या वहींत.

त्यांनीं प्रश्नांकित मुद्रेनें त्याच्याकडे पाहिलें.

मुलानें कारण सांगितलें.

त्यांना तें पटलेसें दिसलें. त्यांनीं त्याला बसावयास सांगितलें.

मुलाच्या उजव्या दंडाला गळूं झाल्यामुळें हात सुजला होता त्याचा.

शिक्षक दुसऱ्या विद्यार्थ्यांजवळ गेले.

वह्या पहातां पहातां बरींच मुलें सांपडलीं उदाहरणें न सोडवलेलीं.

कारणेंही बनावटच सांगितलीं त्यांनीं.

शिक्षकांचा पारा चढला.

त्यांनीं शिक्षा करायला सुरवात केली.

' सप्, सप् ' आवाज येऊं लागला.

" आतां पुन्हां नाहीं विसरणार, सर. " मुलें काकुळतीनें बोलूं लागलीं.

शिक्षकांच्या कानवळणींच पडलीं होतीं अशीं उत्तरें.

' सप्, सप् ' आवाज येतच होता.

मुलांची ठराविक साच्याचीं उत्तरेंही थांबलीं नव्हतीं.

' संध्याकाळीं शाळा सुटल्यावर बसून सर्व उदाहरणें करून मला दाखवून घरीं जायचं. " शिक्षकांनीं शिक्षा फर्मावली.

थोड्याच वेळांत शांत झालें सगळें वातावरण.

शिक्षक टेबलाजवळ आले.

छडी होतीच त्यांच्या हातांत.

त्यांनीं पुस्तक उचललें.

उदाहरण घालायला सुरवात करणार तोंच—

" सर—" तो पहिला मुलगा उठत म्हणाला.

एकदम वर्गांतील पन्नास डोळे त्याच्याकडे लागले.

कांहीं मुलांना तो मध्यें बोलल्यामुळें राग आला.

कांहींना अशा गंभीर वातावरणांत मध्येंच बोलण्याचें त्याचें धाडस पाहून कौतुक वाटलें.

कांहींना तास उदाहरणें न सोडवतांच संपणार म्हणून आनंद वाटला.

शिक्षकांनाही चमत्कारिक वाटलें त्याच्या मध्यें बोलण्यामुळें. त्यांनीं रागांतच पाहिलें त्याच्याकडे.

" काय ? " त्यांनीं प्रश्न केला.

" मला शिक्षा करा सर. " तो शांतपणें उद्गारला.

शिक्षकांना–शिक्षकांनाच काय पण मुलांनाही आश्चर्य वाटलें.

कांहींनीं त्याला वेड्यांतच काढलें.

" तुला शिक्षा करण्याचें कारण ? " शिक्षक.

" मी उदाहरणें करून आणलीं नाहींत. " मुलगा.

" पण तूं सांगितलेलें कारण योग्य आहे. " शिक्षक.

" पण–बाकीच्या मुलांना तुम्ही—" त्याच्यानें पुढें बोलवेना. अश्रूंनीं भरले होते त्याचे ते चिमुकले डोळे.

एक प्रकारची विलक्षण चमक दिसत होती त्याच्या डोळ्यांत.

" समज, तुला मी शिक्षा केली. तरी शाळा सुटल्यावर तुला उदाहरणें सोडवतां येतील का ? " शिक्षकांनीं प्रेमळपणानें विचारलें.

मुलानें नकारार्थी मान हलवली.

" पण सर, इतरांना शिक्षा झाली. मलाही शिक्षा कराच. माझ्यानें राहवत नाहीं. निदान एक तरी छडी—" त्यानें शिक्षकांना सांगितलें.

जणूं मार्क्सच संचारला होता त्याच्या शरीरांत.

शिक्षकांना त्याचें भाषण ऐकून गहींवर आला.

इतक्या लहान वयांत साम्यवाद अंगीं बाणलेला पाहून त्यांना कौतुक वाटलें.

त्यांनीं त्याला पोटाशीं धरलें.

गरिबींतून श्रीमंतीकरितां खटपट करणारे, कष्टमय जीवन सुखमय करण्याकरितां अहर्निश झटणारे जीव अगणित असतात. परंतु केवळ समतेकरितां सुखाचा जीव दुःखांत लोटणारा हा चिमणा बालवीर पाहून शिक्षकांना अचंबा वाटला.

त्या इवल्याशा मूर्तीकडे ते पूज्य भावानें पाहूं लागले.

गुरु शिष्यांची नजरानजर झाली.

दोघांचेही डोळे पाण्यांनीं डबडबले होते.

इतर मुलांच्या डोळ्यांतही पाणी खेळूं लागलें.

मुलाला आवरेना–राहवेना–आणि शिक्षकांची प्रेमळ मिठी सोडवेना.

सारीं मुलेंही तें मनोरम दृश्य पाहून गहिंवरलीं.

"सर, द्या ना छडी—" शेवटीं तो बोललाच.

शिक्षकांनीं तशाही स्थितींत गम्मत करण्याचें ठरविलें.

"बरं तर." शिक्षक म्हणाले.

त्यांनीं त्याला अधिक जवळ ओढलें.

"हं कर हात पुढें—" ते करड्या स्वरांत म्हणाले.

त्यानें निमूटपणें हात पुढें केला.

मुलांना शिक्षकांचा राग आला.

त्यांनीं आपले डोळे पुसले.

त्याला मार बसणार या भीतीनें तीं कावरीबावरी झालीं होतीं.

शिक्षकांनीं हात उंचावला.

मुलांच्या पोटांत धस्स झालें.

तो बालवीर मात्र स्वस्थ उभा होता.

शिक्षकांनीं मारण्याचा मोठा आव आणून छडी हळूच त्याच्या हातावर ठेवली.

" जा आणि त्या कपाटांत ठेवून दे ती. " शिक्षकांनीं त्याला आज्ञा केली.

मुलांना हायसें वाटलें.

त्यांचे पाणीदार डोळे जास्तच चमकले.

चेहऱ्यावर हास्य विलसूं लागलें.

मुलांची आणि शिक्षकांची नजरानजर झाली.

वर्गांत एकच हंशा पिकला.

घंटेचे टोले पडले.

तास संपला.

शिक्षक निघून गेले.

ता. १३ मार्च १९४०
प्रसिद्धी०–युवक (हस्त०)

# योगायोग : २ :

तें एक दांपत्य होतें.

दीड दोन वर्षांपूर्वीच त्यांनीं एकमेकांचे हात एकमेकांच्या हातांत घेतले होते.

तीं दोघेंही सुशिक्षित, सुसंस्कृत आणि सुप्रतिष्ठित घराण्यांतीलच होतीं.

तो एम्. ए. होता; ती बी. ए. होती.

दोघांवरही कॉलेजजीवनाचे बरेवाईट संस्कार झालेले होते.

दोघांच्याही वागणुकीचा सुपरिणाम त्यांच्या शेजाऱ्यांवर झाला होता.

शेजारी त्यांच्याकडे एक आदर्श दांपत्य म्हणून पाहात.

परंतु—

' जसें दिसतें तसें नसतें. ' या नियमाला हें जोडपें कांहीं अपवाद नव्हतें.

लोकांशीं त्यांची वागणूक म्हणजे रंगभूमीवरील पात्राप्रमाणें कृत्रिम.

तें दांपत्य जगाला रंगभूमि समजत होतें.

परंतु त्यांच्या या रंगभूमीला लोक जग समजत.

नाहीं तरी जगांत मुखवटे घालून वावरणारेच फार !

पण त्यांना समाजांत, देशांत आपलें वैशिष्ठ्य राखण्याकरितां मुखवटे धारण करावे लागतात.

त्या दोघांनाही तसेंच कारण होतें.

त्या दोघांचाही प्रेमभंग झाला होता.

अर्थात् प्रेमभंगामुळें आत्महत्या करून स्वतःचा मोलाचा जीव गमावण्याइतकीं तीं दोघें दुबळीं नव्हतीं.

आणि म्हणूनच तीं दोघेंही जणूं मागें-पूर्वायुष्यांत कांहीं घडलेंच नाहीं अशी मनाची समजूत घालून विवाहबद्ध झालीं होतीं.

बाह्य जगाशीं तीं जितक्या मनमोकळेपणानें वागत तितका मोकळेपणा त्यांना परस्परांविषयीं वाटेना.

एरवीं तीं कुणालाही फार प्रेमळ, आनंदी अशीं दिसत.

परंतु एकांतांत ?

त्याचें असें होई.

तीं दोघेंच असलीं कीं प्रणयरंगांत येण्याचा प्रयत्न करीत. पण तो निष्फळ ठरे.

आणि मग तीं एकमेकांपासून दूर होऊन अगदीं उदासीन बसत.

पण असें होण्याचें कारण ?

त्याला प्रणयाच्या वेळीं तिच्याऐवजीं त्याची प्रेयसी दिसे. तिच्या प्रेमळ सहवासांत घालविलेल्या प्रसंगाचा चित्रपट त्याच्या डोळ्यांपुढें उभा राही.

आणि त्याच वेळीं तिच्यासमोर तिचा पहिला प्रियकर ' दत्त ' म्हणून उभा राही. त्याचें दर्शन होतांच तिच्या सर्वांगावर रोमांच उभे राहात.

असें झालें कीं त्यांच्या चित्तवृत्ति ताळ्यावर राहिनाशा होत आणि त्यांचे प्रयत्न फोल ठरत.

' आपल्या अशा वागण्यामुळें तिला आपल्याविषयीं संशय तर वाटणार नाहीं ना ? ' असें त्याला वाटे; तर ' आपल्या या उदासीनतें-

मुळें आपल्या प्रेमाविषयीं त्यांच्या मनांत विकल्प तर येणार नाहीं ना ?' असें तिला वाटे.

दिवसामागून दिवस जात होते.

गतगोष्टींना काळाच्या विशाल उदरांत दडपून टाकण्याचा तीं दोघेंही अगदीं मनापासून प्रयत्न करीत होतीं.

पण पदरीं अपयशच !

शेवटीं एक सुदिन उगवला.

आपलें दुःख दुसऱ्याला सांगितलें कीं तें हलकें होतें म्हणतात.

त्याचप्रमाणें स्वतःच्या कांहीं खाजगी, अगदीं नाजूक गोष्टी जर आपण एकमेकांना–प्रियकराला अगर प्रियतमेला–सांगितल्या तर मनाची टोंचणी कमी होऊन सुखी जीवन जगण्याचा लाभ नाहीं का मिळणार ?

हा विचार त्यांच्या मनांत अलीकडे फार दिवस येई.

परंतु तो आचारांत मात्र येईना.

न जाणों आपलें रहस्य ऐकून तो आपला त्याग तर करणार नाहीं ना ? असें तिला वाटे; तर ' आपण खरी हकीकत तिला सांगितली तर आपणाविषयीं तिला तिरस्कार तर वाटणार नाहीं ना ?' असें त्याच्या मनांत येई.

' सत्य हें कटु असायचेंच.' पण तें ऐकायला मात्र प्रत्येकजण तयार होईलच याचा काय नेम सांगावा !

' त्यापेक्षां तें न सांगितलेलेंच चांगलें नाहीं का ?' असा झगडा त्यांच्या मनांत सारखा सुरू असे.

पण अखेर तिनें निश्चय केला कीं काय होईल तें होवो आज काय तो सोक्षमोक्ष करायचाच !

नेहमींप्रमाणें तीं एकांतांत होतीं.

आज तिचा चेहरा जरी प्रफुल्लित दिसत होता तरी अंतःकरण मात्र धडधडत होतें.

क्षणभर शांतता पसरली.

अखेर तिनेंच शांतताभंग केला.

'मी कीं नाहीं आज आपली क्षमा मागणार आहें.' ती म्हणाली. तिचें हें भाषण ऐकतांच तो जरासा गोंधळलाच.

म्हणजे हिचाही कांहीं आपल्यासारखाच प्रकार—हा विचारही त्याच्या मनांत चमकून गेला.

'क्षमा? अन् ती कशाबद्दल? गुन्हा कळल्याशिवाय क्षमा कशी करायची?' त्यानें विचारलें.

"एक गोष्ट मी आपल्या जवळून लपवून ठेवली होती." ती. त्याची चर्या पालटत होती. कल्पनाशृंखलेचे दुवे जुळत चालले होते.

"कोणती गोष्ट ती?" तो.

पुन्हां क्षणभर शांतता.

'सांगूं कीं नको' याबद्दल पुन्हां तिच्या मनांत विचारांचें द्वंद्व सुरू झालें. परंतु अखेर तिनें सांगायचें ठरविलेंच.

"मी आपल्या प्रेमाला पात्र नाहीं. माझा प्रेमभंग झालेला आहे. मी श्रीमंत आणि ते गरीब एवढ्या क्षुल्लक कारणामुळें आमचा विवाह होऊं शकला नाहीं." तिनें आपलें भाषण संपविलें.

आपल्या बोलण्याचा त्याच्या मनावर काय परिणाम होतो हें ती अगदीं सूक्ष्म रीतीनें पाहात होती.

वरून जरी ती शांततेची मूर्ति दिसत होती तरी तिच्या अंतःकरणांत प्रचंड कालवाकालव होत होती.

या शांत वातावरणाची तिला आतां भीति वाटूं लागली.

वादळापूर्वीची तर ही शांतता नसेल ना ? असेंही तिला वाटलें.

" कां ? असें एकदम गप्प कां झालांत ? " ती.

" परमेश्वराच्या लीलेबद्दल विचार करीत होतों. " तो जरा हंसतच म्हणाला.

" म्हणजे ? मी नाहीं समजलें ! " ती.

" म्हणजे असं कीं आपला योगायोग मोठा विचित्र खरा ! " तो.

तिची अस्थिरता वाढत चालली.

" असं काय तें संदिग्ध बोलायचं ? स्पष्ट सांगावना काय तें. " ती

उत्तर द्यायच्या ऐवजीं तो तिमजली हंसला मात्र.

त्याच्या हास्यामुळें तिच्या मनावर उलटच परिणाम व्हायला लागला.

तिच्या मनांत नाना विचारांची गर्दी होऊं लागली.

सुख–दुःख !

आशा–निराशा !

" सुखाची आशा करायला गेलें पण दारूण निराशा तर पदरीं येणार नसेल ? काय समजायचें यांत " ती आपल्या मनाशीं पुटपुटली.

" अग मीही तुझ्याच कोटींतला आहे. " तो.

" माझ्याच कोटींतले ? म्हणजे ? " ती.

" माझाही प्रेमभंग झाला आहे. " त्यानें आपलें रहस्य उघडें केलें.

तिचा जीव भांड्यांत पडला तें ऐकून.

तिच्या चेहऱ्यावर आतां ऊनपावसाचा खेळ दिसूं लागला.

" पण कारण काय झालें ? " ती.

" आमची जात ! " तो अंतःकरण पिळवटून म्हणाला.

जणूं कांहीं त्याच्या दुःखरूपी जखमेवरची खपलीच कुणीतरी काढली होती.

" जोंपर्यंत प्रेमी जीवांच्या अंगीं उच्च-नीच जातींची, श्रीमंती-गरिबीचीं बंधनें तोडून जाण्याची शक्ति येणार नाहीं तोंपर्यंत असे हे प्रेमभंग व्हायचेच. " तो.

" पण आतां काय ? आतां झालं गेलं गंगेला मिळालं. आपल्या अंतःकरणांतलीं रहस्यें एकमेकांना सांगितल्यामुळें ती आतां अगदीं विशुद्ध झाली आहेत नाहीं का ? " ती.

तिचे समजूतदारपणाचे उद्गार त्याला पटले.

तो मनापासून हंसला.

त्यानें तिला जवळ ओढलें.

शेजारच्या खोलींतून प्रेमगीताचे सूर ऐकूं येत होते-" आली प्रीतीची पहिलीच रात "

त्यांच्याही प्रीतीची ही पहिलीच रात्र नव्हती का ?

प्रसिद्धी—' भगिनी ' जून १९४४.

## जखम : ३ :

ती एक शिक्षिका होती.

पतीचा आधार नाहींसा झाल्यामुळेंच तिला नौकरी करावी लागली.

तीन वर्षांच्या आपल्या छबकड्याकडे पाहून ती आपले दिवस कंठीत होती.

केवळ नाइलाजामुळेंच तिला कांहीं काळ आपल्या बाळाच्या सहवासाला मुकावें लागे.

त्याची सव्याज वसुली ती शनिवारीं व रविवारीं व इतर सुटीचे दिवशीं करी.

पण गेले दोन महिने तिला शनिवारीं व रविवारींही आपल्या बाळाचा सुखद् सहवास घडेना.

याला कारण परिस्थिति !

तिला गर्लगाइडच्या ट्रेनिंग कोर्सला जाण्यास बोर्डाचा हुकूम सुटला.

ट्रेनिंग क्लासेस शनिवारीं व रविवारीं भरत.

बाळाच्या आणि तिच्यामध्यें परिस्थितीची मोठी थोरली भिंत उभी राहिली.

कशी बशी ती आपल्या बाळाची समजूत घाली.

बाळाला आपल्या आईच्या स्वाधीन करून जड अंतःकरणानें ती क्लासला जाई.

क्लास चालू असतां बाळाची आठवण विसरण्याचा ती तात्पुरता प्रयत्न करी; पण कांहीं केल्या तिला तें जमेना.

तिच्या मातृहृदयाला बाळाच्या सहवासाची टोंचणी लागेच.

अशा परिस्थितींत तिच्या दोन मनांचा झगडा लागे.

एक मन म्हणे, " कशाला पाहिजे हें ट्रेनिंग ? जा घरीं आणि झोंप बाळाला कुशींत घेऊन. "

दुसरें मन विचारी होतें.

तें म्हणें, " बाई ग, नोकरी म्हणजे सुळावरची पोळी ! ती खायची तर कष्टाची तयारी पाहिजेच. तशांत हल्लींची परिस्थिति फारच बिकट !

परिस्थिति ! परिस्थिति ! ! परिस्थिति ! ! !

तिच्या अंतःकरणांत कोलाहल उठे.

होतां होतां शेवटचा शनिवार–रविवार आला.

शेवटची मौज लुटावयास मिळावी म्हणून जवळच कोठेंतरी कँपला जावें असें सर्वानुमतें ठरलें.

कँपला जायचें म्हणजे शनिवारीं संघ्याकाळपासून रविवारीं संघ्याकाळपर्यंत बाहेर रहावयास लागणार होतें.

तशांत बाळाची प्रकृति थोडी नादुरुस्त होती.

पुन्हां तिच्या मनांचा झगडा सुरू झाला.

पुन्हां परिस्थितीचं भीषण स्वरूप तिला भेडसावूं लागलें.

पण अखेर विचारी मनानेंच बंडखोर मनावर विजय मिळविला.

ती कँपला गेली.

शरीर कँपला गेलें पण मन मात्र बाळाभोंवती रेंगाळत होतें.

शनिवारीं रात्रीं तिला मुळींच झोंप लागली नाहीं.

रविवारीं सकाळीं ती सर्वांबरोबर हायकींगला गेली.

वाट रानांतून होती.

जिकडे तिकडे दाट जंगल पसरलें होतें.

सर्वजणीं त्यांतूनच हंसत खिदळत मार्गे आक्रमींत होत्या.

" अयाई ग ! " एकदम तिनें किंकाळी फोडली.

चालतां चालतां तिच्या डोक्यांत कांटा बोंचला.

थोडेसें रक्तही बाहेर आलें.

गाईडबाईनीं ताबडतोब उपचार केला.

पण तें दुःख तिच्यानें सहन करवेना.

ती ओक्साबोक्सी रडूं लागली.

इतर सर्वजणी तिच्याभोंवतीं जमल्या.

कांहींना तिची दया आली.

कांहीं तिला रडतांना पाहून फिदीफिदी हंसूं लागल्या.

कांहीं जणूं कांहीं कांहींच घडलें नाहीं अशा थाटांत जवळच फिरकत होत्या.

अखेर गाइडबाईनीं तिला जवळ घेतलें.

तिला मोठ्यांदा हुंदका आला.

तिनें आपलें मस्तक गाइडबाईच्या कुशींत लपवलें.

हृदयाला हृदय मिळालें.

इतर शिक्षकिणींना गाइडबाईनीं पुढें जाण्यास खुणावलें.

त्या निघाल्या.

जातांना होणारा ' सळ्सळ् ' आवाज कमी कमी होऊं लागला.

गाइडबाईनीं तिला कुरवाळलें.

तिला तेवढ्यांतच धीर आला.

तिनें आपली सारी हकीकत मोकळेपणानें सांगण्यास सुरवात केली.

जखम जरी तेवढी फारशी नव्हती तरी तिचें मन घाबरून गेलें होतें.

त्याला तसेंच कारण होतें.

तिचा पतीही अशाच क्षुल्लक अपघातानें मरण पावला होता.

कांट्याचा नायटा होतो ना—

तसंच डोक्याला झालेली जखम जास्त होऊन जर आपलें कांहीं बरें वाईट झालें तर आपल्या बाळाचें कसें होईल याचीच तिला चिंता वाटत होती.

अन् या विचारामुळेंच तिला असीम दुःख होत होतें.

तिनें आपली हकीकत संपवली.

आतां तिला आपला दुःखभार हलका झाल्यासारखें वाटलें.

तिचें कारुण्यमय वृत्त ऐकून गाइडबाईंचेंही हृदय हललें.

" मुली, तुझ्या दुःखांत मी समभागी आहें. पण आतां झाल्या गोष्टीबद्दल वाईट वाटून घेऊन काय उपयोग ! प्राप्त झालेल्या परिस्थितीशीं झगडण्यांतच जीवनाचें खरें मर्म आहे; बरं आहे चल आतां. तुझी जखम कांहीं काळजी करण्यासारखी नाहीं. होईल बरी लवकरच. "

गाइडबाईंच्या भाषणानें तिला अनावर हुंदका आला.

" बाई, ही जखम बरी होईल. परंतु पतिनिधनामुळें झालेली हृदयाची जखम कधींतरी बरी होईल का ! "

प्रसिद्धी—' भगिनी ' मे १९४३

## प्रेमवीर : ४ :

तो एक प्रेमवीर होता.

घरचा संपन्न असल्यामुळें खाणें, पिणें, कपडालत्ता यांचीं मारे चंगळ असे.

प्रेमरसानें ओथंबलेल्या कादंबऱ्या वाचून प्रेम करायला शिकला होता तो.

सायन्स व मॅथमेटिक्स या विषयांतील फॉर्म्युल्याप्रमाणें कथा कादंबऱ्यांतील नायकांचीं प्रेमवचनें त्यानें आत्मसात केलीं होती.

बी. एस्सीच्या परीक्षेंत जरी त्या फॉर्म्युल्यानीं त्याला दगा दिला होता तरी पठण केलेल्या प्रेमवचनांनीं प्रेमपरीक्षेंत बराचसा हात दिला होता.

कोणाही युवतीचा जरासा परिचय होतांच तो प्रेमवचनांच्या माऱ्यानें तिला तात्काळ घायाळ करी.

* * * *

त्याच्या कॉलेजांत अलीकडे एक नवीनच विद्यार्थिनी आली होती.

सौंदर्यांत सर्व कॉलेजकन्यकांना मागें टाकील अशीच होती ती.

सुदैवानें ती या प्रेमवीराच्या वर्गांत होती.

तिला पाहतांक्षणींच प्रेमवीराचा दिल बहोत खुष झाला होता.

कांहींतरी करून हिची ओळख करून घ्यायचा त्यानें निश्चय केला.

वर्गांत प्राध्यापकांना वेडेवांकडे प्रश्न विचारून तर कधीं स्टँपिंग करून, पोषाखांत फेरबदल करून, उशीरा येऊन, त्यानें आपलें अस्तित्व तिच्या नजरेस आणलें.

हळुहळू एखाद दुसऱ्या शब्दाची देवघेवही त्यानें सुरू केली.

परंतु त्याला त्यापासून समाधान लाभेना.

दोन दिवस झाले, चार झाले, आठवडा, पंधरवडा झाला तरी त्याला इच्छित सुवर्णसंधी लाभेना.

तो बेचैन झाला.

त्याला सारखा तिचा ध्यास लागला होता.

वर्गांत प्राध्यापकांच्या व्याख्यानापेक्षां तिच्या सौंदर्याचें पान करण्यांतच तो अधिक रमत असल्यामुळें अलिकडे कोठेंही तो गेला, कांहींही काम करूं लागला, कीं तिची प्रतिमा त्याच्या मनःचक्षूंपुढें उभी राही.

अखेर असे दिवस जातां जातां तो सुदिन उगवला.

ती रीडिंग रूममध्यें वाचीत बसली होती.

तिच्या बाहेर येण्याची वाट पहात तो बागेंतच रेंगाळत होता.

इतक्यांत—

" अय्या! इथं काय करतां!" पाठीमागून एक आवाज आला.

त्यानें मागें वळून पाहिलें.

विजेचा झटका बसला त्याला.

ती नवीन व्यक्ती त्याची पूर्वीची प्रेयसी होती.

पंधरवड्यापूर्वी तो तिचा दास-बंदा गुलाम होता.

तिच्या प्रेमपुष्पाची जोपासना करण्याकरितां अहोरात्र तो झटत होता.

पण या पंधरवड्यांत—

अस्सल मिळाल्यानंतर नकली मालाला कोण भुलेल!

" असं काय? बोलत कां नाहीं? या पंधरवड्यांत मला विसरलांत वाटतं! मी चार वेळां घरीं येऊन गेलें तरी स्वारीचा पाय ठिकाणावर नव्हता. इश्श! बोला ना गडे—" ती त्याला गदगदा हलवीत म्हणाली.

तो शुंभासारखा उभा होता.

पण त्याची नजर मात्र रीडींगरूमवर खिळली होती.

" काय होतंय काय तुम्हांला ? " तिनें जरा रागांतच विचारलें.

" अं ! कांहीं नाहीं. जरा प्रकृति बरी नाहीं. " तो उद्गारला.

" डोकं का दुखतंय ? " ती.

" होय ! " तो त्रासिक मुद्रेनें म्हणाला.

इतक्यांत ती लावण्यलतिका—त्याची नवी शिकार—रीडींगरूममधून बाहेर पडतांना दिसली त्याला.

त्याच्या सुकलेल्या चेहऱ्यावर पुन्हां टवटवी दिसूं लागली.

आशाळभूत नजरेनें तो तिची मार्गप्रतीक्षा करीत होता.

जुन्या प्रेयसीच्या तें लक्षांत यायला मुळींच वेळ लागला नाहीं.

स्वारी हातची गेली हें तिनें तेव्हांच ताडलें.

ती त्याच्यावर चिडली, रागावली, संतापली, त्याची थोडीशी हजेरी घेतली; परंतु तो शांतच होता.

शेवटीं ती फणकाऱ्यानें निघून गेली.

नूतन प्रेयसी मंदगतीनें जिन्यावरून उतरत होती.

त्याला तिचें येणें ' गंगावतरणासारखें ' भासलें.

काय तें सौंदर्य ! काय ती मोहक शरीरयष्टि ! काय तो नखरा !

प्रेमवीरानें आपला दिल तिच्यावर कुर्बान करून टाकला.

तिची आणि त्याची नजरानजर झाली.

दोघांच्याही गालांवर स्मित झळकलें.

दोघांनींही आपली दंतपंक्ती दाखवून एकमेकांचें स्वागत केलें.

" अजून गेला नाहीं तुम्ही ? " कांहींतरी बोलायचें म्हणून बोलली ती.

आधींच अर्धमेला झालेला प्रेमवीर तीच प्रथम बोलली म्हणून पुरा थंडावला.

" बसलों होतों वाचीत ! " त्यानें उत्तर दिलें.

" कसलं एवढं वाचन चाललं होतं ? " तिचा दुसरा प्रश्न.

" हीच कादंबरी वाचीत होतों. " पुस्तक दाखवीत तो म्हणाला.

त्याचा धीर आतां चेपत चालला होता.

" बाकी पुस्तक पण पुस्तक आहे बघा ! कादंबऱ्या लिहाव्या तर अशा ! काय एकेक सिच्युएशन्स आहेत पहा ! आत्तांच वाचलेलें एक प्रकरण दाखवतों तुम्हांला. हं, उभ्या का ? बसा ना." पुस्तक चाळतां चाळतां त्यानें एकदम तिच्यावर हल्ला केला.

या माऱ्यानें ती थोडीशी बावरली पण तिनें स्वतःला सांवरलें अन् ती खालीं बसली.

प्रकरण काढीत असतांच तो जरा तिच्याजवळ सरकला.

तीही जरा सरकून व सावरून बसली.

त्यानें प्रकरण वाचायला सुरवात केली.

त्याच्या ऐटबाज वाचनाची तिच्या मनावर मोहिनी पडली.

तो वाचीत होता अन् ती एकाग्रतेनें ऐकत होती.

पानामागून पान संपत होतें.

तसतसें त्यांच्यांतील अंतरही कमी कमी होत होतें.

शेवटीं प्रकरण संपलें.

प्रकरणाच्या शेवटीं नायकनायिका एकमेकांच्या बाहुपाशांतील स्वर्गतुल्य सुख अनुभवीत होतीं.

आमचा नायक नायिकेच्या अगदीं जवळ आला होता.

वाचनाची धुंदी कमी होतांच ती सावध झाली अन् चमकून त्याच्या-पासून जरा दूर झाली.

" ऐकलंत प्रकरण ! " नायक-नायिकेची भेट कशी स्ट्रायकींग आहे ! अगदीं आपल्या सारखींच ! " तो बोललाच.

ती बोलली नाहीं पण जराशी हंसली मात्र.

प्रेमवीराला किल्ला सर केल्याचें समाधान वाटलें.

" बरं चालायचें ना आतां? घरींच जाणार ना?" त्यानें पृच्छा केली.

तिनें होकारार्थी नुसती मान हलवली.

" चहा घेऊनच जाऊं आतां" प्रेमवीरानें संबंध अधिक घट्ट करण्याच्या निमित्तानें संधीचा फायदा घेण्याकरितां म्हटलें.

दोघेंही चालू लागलीं.

कुणालाही आनंदच झाला असता त्यांना चालतांना पाहून.

अगदीं 'लक्ष्मी-नारायणा'सारखा जोडा शोभत होता तो.

पण!!

विधिघटना निराळीच होती.

* * * *

महिन्याभरानंतर ती एक दिवस अचानक स्वतःच त्याच्या घरीं गेली.

तिला आलेली पाहून प्रेमवीराला अस्मान ठेंगणें वाटूं लागलें.

तिच्या स्वागतासाठीं काय करूं अन् काय न करूं असें त्याला होऊन गेलें.

" या! आज सकाळींच इकडे कुणीकडे!" त्यानें अधीरतेनें विचारलें.

" तुमचीच भेट घ्यायला आलें होतें. म्हटलं भेट होते कीं नाहीं!" ती उत्तरली.

तिचे शब्द ऐकून प्रेमवीराला आपण अगदीं अंतराळांत विहार करीत आहोंत असें वाटूं लागलें.

" उद्यांपासून चार सहा दिवस मी गांवीं जाणार आहें." ती.

प्रेमवीराचें विमान एकदम कोसळलें अन् तो एकदम खालीं आला.

" कां? एवढ्या धांदलीनें चाललात?" त्यानें प्रश्न टाकला.

ती नुसती हंसली.

तिनें आपली नाजूक पर्स उघडली.

तिच्या मूकाभिनयानें प्रेमवीराची अधीरता वाढत चालली.

तिनें पर्समधून एक गुलाबी पाकीट बाहेर काढलें.

प्रेमवीराच्या डोळ्यांपुढें काजवे चमकले.

डोळ्यांत कचरा गेल्याचें मिष करून त्यानें ते साफ केले.

लिफाफा कसला असावा याचा त्यानें अंदाज बांधला.

संकटकाळीं मनांत नेहमीं अशुभ विचारच प्रथम डोक्यांत डोकावतात हेंच खरें!

त्यानें मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

असेल कोणा नातेवाईकाचें लग्न.

लिफाफा काढून तिनें प्रसन्न मुद्रेनें त्याच्या हातीं दिला.

तो उघडतांना त्याच्या हाताला कंप सुटला होता, हृदय धडधडत होतें, मन अस्थिर झालें होतें.

त्यानें लिफाफा उघडला.

आंतील इन्व्हिटेशन बाहेर काढलें.

त्यावरील Miss Pushpa with Master Jayant हे शब्द पाहतांच त्याचा चेहरा अगदीं फोटो घेण्यासारखा झाला.

गरीब बिचारा प्रेमवीर!

२२-१-१९४२

---

## तारका : ५ :

ती एक तारका होती.

सौभाग्यवती असूनही ती नाटक धंद्यांत पडली होती.

प्रसंग पडला म्हणून तिनें या धंद्यांत पदार्पण केलें नव्हतें तर तिला लहानपणापासूनच या कलेची आवड होती.

रंगभूमीवर निरनिराळ्या कंपन्यांतून, क्लबांतून, सम्मेलनातूंन तिनें उत्कृष्ट भूमिका केल्यामुळें ती बरीच नांवारूपास चढली होती. तिचें सौंदर्यही तसेंच वाखाणण्यासारखें होतें !

अनुपम सौंदर्य, उत्कृष्ट अभिनय आणि वागण्यांतील मोहक मोकळेपणा या त्रिवेणी संगमामुळें प्रत्येक कंपनीला, क्लबाला तिनें आपल्याकडे कायम रहावें असें वाटत असे.

परंतु ती कायम अशी कोठेंच रहात नसे.

ती मुख्य नायिकेची भूमिका करी.

तिच्याबरोबर नायकाची भूमिका करण्याचा मान मिळावा म्हणून नटांची कोण धडपड !

आतांपर्यंत निरनिराळ्या पुष्कळशा नटांबरोबर तिनें भूमिका केल्या.

प्रत्येकाला तिच्याविषयीं आपलेपणा वाटे.

ती नाटकांत भूमिका करायला असली कीं तालमीच्या वेळीं सभासदांची, मित्रांची कोण गर्दी असायची तिथं !

एरवीं नुसता शुकशुकाट असायचा.

अशाच एका क्लबाच्या नवीन नाटकांत तिनें मुख्य भूमिका केली.

नाटकांतील नायक क्लबांतीलच एक घटक.

त्यानेंही आपली भूमिका उत्तम वठवली.

निरनिराळ्या वृत्तपत्रांतून दोघांच्याही स्तुतीनें रकानेच्या रकानें भरून येऊं लागले.

नाटकाचे प्रयोगही धुमधडाक्यानें सुरू झाले.

'हाऊस फुल्ल'च्या पाट्या थिएटराबाहेर झळकूं झागल्या.

ज्या क्लबाचे अस्तित्वही लोक विसरले होते त्याच क्लबाचा आज जिकडे तिकडे बोलबाला चालला होता.

त्याला कारण म्हणजे ती तारका आणि तो तरुण नट.

जसजसे प्रयोग होत गेले तसतसा त्यांचा संबंधही फार येऊं लागला.

पुढें पुढें त्याच्यानें तिच्याशिवाय क्षणभरही राहवेना.

कांहींना कांहीं निमित्त काढून तो तिच्या सहवासाची भूक शमवीत होता.

परंतु आतां त्याच्यानें राहवेना.

त्याच्या हृदयांत एक नवीनच संवेदना निर्माण झाली होती.

चिरसहवासाची त्याची आकांक्षा बळावत चालली.

तिला कांहींच कल्पना नव्हती.

तिचा मोकळेपणा कायमच होता.

अलिकडे त्याचें कुठेंच लक्ष लागेना.

त्याच्या भूमिकेंतील समरसता बरीच कमी होऊं लागली.

डायरेक्टर ओरडूं लागले.

सर्वांनीं 'स्वारी चळली' असा शेरा मारला.

तिनेंही त्याला एकदां तसेंच विचारलें.

तो बोलला नाहीं; परंतु नुसता हंसला.

या संधीचा फायदा घ्यायचा त्यानें ठरविलें. परंतु त्याच्या तोंडांतून शब्दच बाहेर पडेनात.

असेच कांहीं दिवस गेले.

शेवटीं त्यानें मनाचा हिय्या केला आणि एक दिवस आपलें हृदय तिच्यापुढें उघडें केलें.

तिला तें ऐकून धक्का बसला नसला तरी आश्चर्य वाटलें खास !

तिनें त्याला आपण विवाहित असल्याचें बजावलें.

त्याला तें माहीत असून देखील त्यानें आपलेंच घोडें पुढें दामटलें.

" तुझ्या प्राप्तीशिवाय हा जीव जगवणें आतां अशक्य आहे. " असें सांगायलाही त्यानें कमी केलें नाहीं.

" नाट्यसृष्टींतील नाजूक शब्दांचा नाटकांतील पात्रांवर परिणाम होतो. सत्यसृष्टींतील व्यक्तींवर होईलच असें नाहीं. " तिनें सांगितलें.

" मला तुझें प्रेम पाहिजे आहे. " तो.

" मग तें तर आहेच आपल्यावर. " ती.

" माझ्याशीं इतका वेळ विनाकारणच कठोर वर्तन केलेंस म्हणायचं. " तो.

" म्हटलं पहावी परीक्षा करून. " ती.

" मग उतरलों ना परीक्षेंत ? " असें म्हणून तो तिला जवळ ओढण्याकरितां आपल्या डाव्या हाताचा विळखा तिच्याभोंवती घालणार तोंच—

" हां खबरदार. " ती कडाडली.

तो चटकन मागें सरकला.

तिची मुद्रा पाहून त्याला भीति वाटली.

तरीपण तो आशावादी होता.

' फिरून यत्न करून पहा ' हें ब्रीदवाक्य तो विसरला नव्हता.

त्यानें प्रयत्नाला सुरवात केली.

" लाडके, अजून थट्टा संपली नाहीं का? माझ्यावर तुझें प्रेम आहे ना?" तो जरा लगट करून म्हणाला.

" होय आहे ना. " ती.

तो आनंदला.

मनांतल्या मनांत त्यानें परमेश्वराचे आभार मानले.

" पण— " ती.

" पण? अजून पणच? तो.

" तुमच्यावर माझें प्रेम आहे पण तें– " ती.

" बोल, लाडके बोल. अगदीं संकोच करूं नकोस " तो अधीरतेनें म्हणाला.

' तें बंधुप्रेम आहे. ' तिनें आपलें वाक्य पूर्ण केलें.

" बंधुप्रेम ! " वज्राघात झाल्याप्रमाणें तो तरुण कोलमडून पडला.

तारका त्याच्याकडे पहात राहिली.

—मे १९४० ( युवक–हस्तलिखित. )

---

# दोन दृश्यें : ६ :

( १ )

अगदीं पट्टीचा पिणारा होता तो.

कॉंग्रेस सरकारनें दारूबंदीची घोषणा करतांच मनस्वी संताप आला होता त्याला.

निवडणुकीच्या वेळीं कॉंग्रेसला मतें दिल्याबद्दल आज त्याला पश्चात्ताप होत होता.

दारूबंदीच्या निषेधार्थ ज्या सभा झाल्या त्या सर्व सभांत त्यानें पुढाकार घेतला होता.

दारूबंदीप्रचार सभा उधळून लावण्याकरितां त्यानें सक्रीय मदत करण्यास कमी केलें नव्हतें.

दारूबंदीचा निषेध करणाऱ्या चळवळ्यांचें कांहीं चाललें नाहीं.

संपूर्ण दारूबंदी होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं.

सरकारचा सूड घेण्यासाठीं त्यानें पिण्याचें मानही कितीतरी पटीनें वाढविलें.

सरकारला व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणण्याचा काय अधिकार आहे अशी त्याची विचारसरणी होती.

दारू दुकानदारानें त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला. त्याला आपल्या दुकानांतला माल संपवायचा होता.

१ ऑगस्ट जवळ येत चालली होती.

त्याचें व्यसनही वाढतच होतें. बिलाचा आंकडाही फुगत होता.

गिऱ्हाइकाचे पैसे बुडण्याची भीति नसल्यामुळें दुकानदारानेंही सढळ हातानें उधारी वाढविण्यास सुरवात केली.

पिण्याचें मान वाढल्यामुळें कौटुंबिक कलहाची कमाल मर्यादा झाली.

दारूच्या निशेंत बायकापोरांना तो मारहाण करूं लागला.

मुलांची फी न भरल्यामुळें त्यांच्या शिक्षणाची समाप्ति झाली.

अखेर १ ऑगस्ट उजाडली.

जिकडे तिकडे दारूबंदी झाली.

त्याच्यासारख्या पट्टीच्या पिणारांची अनुकंपनीय स्थिति झाली.

व्यसन वाढल्यामुळें त्याला कांहीं एक सुचेनासें झालें.

मन:स्वास्थ्य बिघडूं लागलें.

त्यांतच कापडवाला, वाणी, दारू दुकानदार यांच्या तगाद्यानें आगींत तेल ओतल्यासारखें झालें.

सर्वांत दारू-दुकानच्या बिलाचा आंकडा बराच फुगलेला होता.

एक दिवस त्याचे डोळे उघडले.

अगदीं खाडकन् उघडले.

पण उपयोग काय !

दारू मिळविण्यासाठीं डॉक्टरचे खोटेंच सर्टिफिकेट दाखविल्यामुळें त्याला पकडण्यांत आलें.

त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.

त्याची नोकरी गेली.

अब्रूही गेली.

संसाराची धुळधाण झालेली पाहून त्याला पश्चात्ताप झाला.

कृतकर्माचें प्रायश्चित घेण्यासाठीं त्यानें एक दिवस जलसमाधि घेतली.

( २ )

हाही पहिल्याप्रमाणेंच पट्टीचा नसला तरी पिणारा होताच.

दोघांनीं एकाच बैठकींत दारूदीक्षा घेतली. होती.

एकदां हा सहज दारूबंदी प्रचारसभेला गेला होता.

प्रचारकाच्या भाषणाचा अत्यंत परिणाम झाला याच्यावर.

आपल्या घरच्या परिस्थितीचें मूर्तिमंत चित्रच त्यानें आपल्या डोळ्यां-समोर उभें केल्यासारखें वाटलें त्याला.

आपल्या पत्नीच्या करुण किंकाळ्या याच्या कानांत घुमूं लागल्या.

मुलांबाळांचीं कृश शरीरें आणि त्यांचा आक्रोश भेडसावूं लागला.

याला पुढें ऐकवलें नाहीं.

सभेंतून उठला हा ताबडतोब.

त्याच पावलीं घरीं आला.

याचे डोळे पूर्णपणें उघडले.

१ ऑगस्टला अजून अवकाश होता.

यानें विचार केला.

विचाराचें निश्चयांत रूपांतर झालें.

आतां याचें दारूचें व्यसन फारच कमी झालें.

महिन्यांतून फार तर एक दोन वेळांच याला आठवण येई.

पण निश्चय मागें खेंचित असे.

अखेर एक ऑगस्ट उजाडली.

याचें व्यसन कायमचें सुटलें होतें.

स्वतःचें नांव स्वखुषीनें यानें दारूबंदी स्वयंसेवक पथकांत दाखल केलें होतें.

लोकांना हा दारू सोडण्याबद्दल उपदेश करूं लागला.

दारूपायीं होणारा खर्च आतां संसारकार्यासाठीं होत होता.

संसाराची विस्कटलेली घडी सावरली, इतकेंच नव्हे तर सुधारलीही.

समाजांत आतां याला मान मिळूं लागला.

वेळींच सावध झाल्यामुळें याला ही परिस्थिति प्राप्त झाली.

नाहीं तर याची पहिल्या माणसाप्रमाणेंच अवस्था झाल्याशिवाय राहिली असती काय ?

प्रसिद्धी—‘ प्रकाश. ’ २ जुलै १९३९